
# महाभारत

मराठी अनुवाद

श्री. अशोक कोठारे



खंड ३८

शांतीपर्व

# महाभारत

## महाभारत खंड अडोतिसावा

## शांती पर्व भाग तिसरा

## राजधर्मानुशासन पर्व

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.

http://www.esahity.com/2309234323812351236623402381235 0.html

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० मार्च २०२१**

## अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा अडोतिसावा खंड, शांती पर्व भाग तिसरा आपण आता वाचणार अहात.

शांती पर्वात हिंदू धर्माचे मूलभूत ज्ञान सांगितले आहे. त्यात नितीशास्त्र, अध्यात्म विद्या आणि कर्मकांड अशा तीन विभागात ते दिलेले आहे. युधिष्ठीर व भिष्म ह्यांच्या संवादाच्या रुपात ते दिलेले आहे. नितीशास्त्रात माणसांने इतर लोकांशी, प्राण्यांशी व वस्तुमात्रांशी कसे व्यवहार करावेत त्याचे विवरण आहे. अध्यात्मविद्येत माणसांने त्याच्यामध्ये असलेल्या आत्म्याला कसे समजून घ्यावयाचे त्याची चर्चा केलेली आहे. कर्मकांड माणसाला त्याचे भाग्य बदलण्याची इच्छा असते त्यासाठी विविध देवतांना कसे खूष करावयाचे त्यासाठी काय करावे त्याची माहिती आहे. कर्मकांड हा एकाप्रकारे भ्रष्टाचाराचा भाग आहे. देवतांना वशिले लावून आपले भाग्य सुधारता येते अशा संकल्पनेतून हा भाग विकसित झाला आहे. कर्मकांड कितपत माणसाचे दैव सुधारू शकते हा विवाद्य विषय आहे. मनुष्य आशावादी असतो व म्हणून तो कृत युगापासून त्या वशिलेबाजीत रमलेला आहे. कृतयुगात प्रामुख्याने यज्ञ त्यासाठी सांगितले आहेत. परंतु, कलीयुगात त्याचे स्वरुप बदलून सामान्य पुजा विधीमध्ये ते रुपांतरीत झालेले आपण पहातो. उपास तापास, व्रतवैकल्ये, शाकाहार करणे अशी आणखीन कांहीं रुप कर्मकांडात आपण पहातो. शुद्ध हिंदू धर्मात कर्मकांडाला महत्व नसते. त्यात पहिले दोन म्हणजे नितीशास्त्र आणि अध्यात्मविद्या ह्यांच्यावर भर असतो. कर्मकांडाचे महत्व पुरोहित वर्गांने त्यांच्या स्वार्थासाठी अवास्तव प्रमाणात वाढवले आहे आणि कर्मकांडातील विधी करणे म्हणजेच हिंदू धर्म असा एक गैरसमज पसरवण्यात ते यशस्वी झालेले आहेत हे आपल्याला दिसते. त्यासाठी अनेक संघटना पुरोहीत वर्गाने यशस्वीपणे कार्यरत केल्या आहेत. समर्थ रामदासांनी तीनशे वर्षापूर्वीच त्यांच्या दासबोधात ते सगळे दिले आहे परंतु, त्याकडे हिंदू समाजाचे त्याच्या अशिक्षित रहाण्याच्या प्रवृत्तीमुळे दुर्लक्ष झालेले आहे. प्रत्येक हिंदूंने त्याला त्याचा धर्म समजून घ्यावयाचा असेल तर शांतीपर्व चांगले लक्ष देऊन वाचावे.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत,

साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल

असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राजांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –
ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in
ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories
I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy
Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

## - शांती पर्व भाग तिसरा -

## राजधर्मानुशासन पर्व पुढे चालू

### भाग एकशे एक

युधिष्ठीर विचारतो, "युद्धात हमखास यशस्वी होणार्या लष्कराची लक्षणं कोणती असतात, ते मला तुमच्याकडून समजून घ्यावयाचे आहे"?

भिष्म सांगतात, तसे पहाता राज्यातील ज्ञानी ब्राह्मण व पुरोहित त्यांच्या तपस्येने व यज्ञादि विधीने जे मंत्राने युक्त असतात त्या सैन्याचे यश निश्चित होत असते. तरी कांहीं दृष्य लक्षणं आहेत ती सांगतो, जे सैन्य व त्यातील पशु (हत्ती, घोडे इत्यादी) सक्षम असता, त्यांचे मनोबळ उत्तम असते ते सैन्य यशस्वी होत असते. जेव्हां वारे त्या सैन्याच्या मागून पुढे वहात असतात, आकाशात इंद्रधनुष्य त्यांच्या बाजूने दिसत असते, आकाशातील ढगं त्यांच्यावर सावली टाकत असतात, त्याच प्रमाणे कोल्हे, लांडगे व गिधाडं शत्रूपक्षाच्या बाजूला आढळतात तेव्हां त्या सैन्याचा विजय निश्चित असतो. पवित्र अग्नीत ओतलेले तुप त्याचा सुगंध देत असते, त्या अग्नीच्या ज्वाळा दक्षिणेकडे वळत असतात, रणवाद्यांचे आवाज विशेष जाणवत असतात, त्यावेळी यशाची खात्री असते. योद्धे लढण्यासाठी उत्सुक असतात तेव्हां त्या सैन्याला यश मिळणार असे समजावे. जर हरणाची जोडी त्या सैन्याच्या उजव्या बाजूने जात असेल तर ते चांगले लक्षण समजले जाते. परंतु जर ती जोडी विरुद्ध दिशेने जात असेल तर ते चांगले लक्षण समजले जात नाही. हंस, बगळे, सत्पत्र आणि तसे पक्षी आकाशातून ओरडत जात असतील तर ते चांगले समजावे. सैन्यातील योद्धे एकमेकांशी सलोख्याने वागत असतील व त्यांच्यात वादावादी होत नसेल तर ते चांगले लक्षण समजले जाते. कावळे योद्ध्याच्या डाव्या बाजूला घिरट्या घालत असतील तर ते चांगले समजल जाते. तुझ्याकडे कितीही मोठे सैन्य असले तरी प्रथम तू समझौता करण्याचा प्रयत्न करशिल व जर ते शक्य नाही असे खात्रीने दिसू लागले तरच युद्धाचा निर्णय घ्यावयाचा असतो. विनाकारण मनुष्य व इतर जीवितहानी करणे ब्रह्माला मंजूर नसते. जे राजे त्यांच्या बळाच्या मस्तीने उन्मत्त होऊन घाईने युद्ध छेडतात ते जरी जिंकले तरी स्वर्गात जात नाहीत. युद्ध करून मनुष्यहानी

करून जिंकण्यापेक्षा समझौत्याने जिंकणे ब्रह्माला विशेष प्रिय असते. त्याचे कारण युद्धाचे यश लढणार्यांपेक्षा त्यांच्या भाग्यावर जास्त अवलंबून असते. समझौत्याचे यश ते करणार्यांच्या कर्तृत्वावर जास्त अवलंबून असते. म्हणून ते नेहमी जास्त श्रेयस्कर समजले जाते. युद्ध हि एक महागडी गोष्ट आहे त्या मानाने समझौता फारच कमी खर्चाचा असतो. बर्याच वेळा एका सैनिकाच्या पळून जाण्यामुळे इतर सैनिकसुद्धा पळून जाऊ लागतात व हातात आलेले यश जाण्याचा संभव असतो. जीवाची बाजी लावणारे संख्येने कमी असलेले सैन्य घाबरलेल्या मोठ्या लष्कराला हरवत असते. यशाचा संबंध सैनिकांच्या शौर्यावर व हिम्मतीवर अवलंबून असतो. चिडलेले सैनिक पाहून सुद्धा घाबरलेले सैन्य पळून जात असते. म्हणून आपण फार चिडलो आहोत असा अविर्भाव सैनिकांच्या चेहर्यावर असेल तर ते कामी येते. शत्रूचे सैनिक किती बहादूर आहेत त्याचा अंदाज घेऊन युद्धाची तयारी करावयाची असते. जर शत्रूचे सैन्य खरोखरच बहादूर आहे असे समजले तर प्रश्न सामोपचाराने सोडवण्यावर जास्त भर द्यावा. युद्ध होणार ह्या वार्तेने त्या राज्यातील प्रजेची कोणती मनस्थिती होते त्याचा राजाने अंदाज घ्यावयाचा असतो. जर जनता त्यामुळे होणार्या हिंसाचाराच्या अपेक्षेने व्यथीत झालेली दिसत असेल तर युद्धाचा बेत लांबणीवर टाकणे चांगले परंतु, जर प्रजा युद्धाच्या अपेक्षेने उत्तेजित झालेली असेल तर युद्ध ताबडतोब प्रारंभ करावे. त्याकरतां, राजाचे हेरखाते जनमानसाचा मागोवा घेत असले पाहिजे. कारण राजा एकटा ते युद्ध छेडत नसतो तर त्याची सगळी प्रजा ते करू इच्छित असते. अशा युद्धाला धर्मयुद्ध म्हणतात. राजा त्याच्या स्वार्थी उद्देशाने युद्ध सुरू करेल प्रजेच्या मर्जीविरुद्ध तर ते अधर्मयुद्ध ठरते. अशा परिस्थितीत युद्धाचा प्रस्ताव विचार पूर्वकपणे आणला पाहिजे. दोन प्रकारच्या चढाया असतात. एकात राजा फक्त शेजारच्या राज्यात लूटमार करून परत फिरणारा असतो, त्याला तो प्रांत काबिज करावयाचा नसतो. दुसर्या चढाईचा उद्देश तो प्रांत त्याला काबिज करावयाचा असतो. त्या प्रमाणे राजा त्याचे सिमोल्लंघन करत असतो. बर्याच वेळी राजा त्याच्या वेतनी सैनिकांपेक्षा शिलेदारांचा उपयोग पहिल्या प्रकारच्या चढाईत करत असतो. दुसर्या प्रकारच्या चढाईत मात्र तो त्याचे वेतनी सैन्य वापरतो.

जर राजा प्रजेच्या सेवेचे त्याचे काम बरोबर करत नसेल तर त्याच्या शेजारील चांगला राजा त्या अकार्यक्षम राजाला ताकीद देईल व तरी तो सुधारला नाही तर त्याच्यावर स्वारी करुन तो प्रांत काबिज करील. त्यानंतर जर तो हरलेला राजा क्षमा करण्यास योग्य वाटला तर त्याला युद्धाच्या खर्चाचा एवढा दंड करून माफ करील. नाहीतर ते राज्य त्याच्या राज्यात विलीन करील. अशारितीने काम करणारा राजा सगळ्या राजांच्या समाजात ख्यातनाम होतो.

राजाचे वागणे असे असावे की, तो फार कठोर अथवा फार मवाळ नसावा. आवश्यकते नुसार त्याचे धोरण असले पाहिजे. समझौता नाकारल्यानंतर जे युद्ध होते त्यात जो जिंकतो तो घोषणा करतो कीं, समझौता केला असतां तर इतकी माणसं मारली गेली नसती, इतके प्राणी मारले गेले नसते इतके नुकसान झाले नसते पण समझौता नाकारला म्हणून हे घडले असे सांगून समझौता नाकारणार्या राजावर दोष तो देईल. स्वतः नामानिराळा राहील. त्यावेळी त्याच्या पक्षाच्या योद्ध्यांच्या युद्धकौशल्याचे तो कौतुक करील व त्यांना शाबासकी देईल कीं, त्या योद्ध्यानी लढाई जिंकली. राजा हरलेल्यांच्या सैनिकांना सांत्वन पर बोलेल व त्यांच्या हानिबाबत खेद जाहिर करील. असे वागून राजा त्या शत्रूपक्षाच्या सैनिकांचे मन जिंकण्याचा प्रयत्न करील. अशारितीने राजा मोठ्या खूबीने सगळ्यांची मनं जिकेल व त्याचे राज्य मजबूत करील.

शांती पर्व भाग एकशे एकावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे दोन

युधिष्ठीर बोलतो, "मला सांगा आजोबा, मवाळ राजाशी मी कसे वागावे? त्याच प्रमाणे उन्मत्त राजाशी मी कसे वागावे, दोस्त राजाशी मी कसे वागावे"?

भिष्म सांगतात, त्या संदर्भात मी तुला बृहस्पती आणि इंद्राचे संभाषण सांगतो, इंद्र बृहस्पतीकडे हात जोडून विचारतो, मला सांगा, मी माझ्या शत्रू राजांशी कसे वर्तन ठेवावे? मी त्यांना, मारून न टाकता, कां व कसे पराजित करावे"? अशा कोणत्या कारवाया आहेत त्या मला वापरता येथील त्याबद्दल सांगा. लढाईत कोणी एक जिंकत असतो. अशावेळी मी त्या नमलेल्या राजांचे मन न दुखवता त्यांचे सहकार्य कसे प्राप्त करू शकेन"?

राजांच्या सगळ्या कामाचे चांगले ज्ञान असलेले बृहस्पती बोलतात, राजा कधी कोणाशी भांडण करणार नाही. त्यांमुळें कांहीं साध्य होत नसते. त्याच वेळी राजा त्याचे म्हणणे शांतपणे मांडील ज्यात मुद्देसुदपणा असेल. कारण भांडणात तो नसतो फक्त क्रोध असतो जो राजाच्या कामासाठी योग्य नसतो. जेव्हां शत्रूचा नाश करावयाचा असतो तेव्हां त्याला अजिबात पत्ता लागला नाही पाहिजे कीं, राजाच्या मनात काय आहे. तसे जर त्याला समजले तर तो सावध होतो व सावध शत्रूला चीत करणे अवघड असते. तो बेसावध राहील ह्याची लक्षता बाळगावयाची असते. राज्याच्या मनात काय चालले आहे ते कोणालाही समजणार नाही असे त्याचे वागणे असले पाहिजे. आपण बेसावध आहोत असे दाखवत राजा त्याची पावलं टाकत असेल. त्यामुळे शत्रूसुद्धा तसाच बेसावध रहातो. जसे पारधी पक्षांना पकडतांना दाखवतो कीं, त्याला पक्षी आल्याचे माहीत नाही व त्यांमुळे पक्षी त्याच्या जाळ्यात अडकतात तसे धोरण राजाचे असले पाहिजे. जसे बगळा पाण्यात शांतपणे उभा असतो ज्यामुळे मांसे बेसावधपणे त्याच्या जवळ जातात व त्याच्या तावडीत सापडतात तसे राजाचे बकध्यान असले पाहिजे शत्रूला आवरण्यासाठी. शत्रूला पकडल्या नंतर जर त्याला मारणे श्रेयस्कर असेल तर मारून टाकावे. शत्रूचा पराभव झाल्यानंतर सुद्धा राजा निवांतपणे झोपू शकत नाही. कारण

त्या शत्रूचे मित्र आता राजाच्या मागावर असतात. राजा त्याच्या मंत्रीमंडळाच्या सल्ल्याने काम करत असेल. राजाचे छुपे दुष्मन तो कधी बेसावध होतो त्याची वाट पहात असतात. राजा त्याच्या मंत्रीमंडळात कोणी कमजोर कडी आहे ते तपासून पाहिल. कारण ती कमजोर कडी शत्रूचा फायदा करू शकते. अपेक्षित प्रतिस्पर्ध्याच्या संगतीत राजा कधींच रहाणार नाही. त्याच्या बरोबर जेवणार नाही. राजा कठोर वाणी वापरून शत्रू निर्माण करणार नाही. राजा कमी बोलेल परंतु, त्याच्या प्रधानांना शत्रूंशी बोलण्यास परवनगी देईल. त्या द्वारा त्याला शत्रूचे बेत समजतील. शत्रूतील कमजोर कडी कोण ते तो त्याच्या हेरांकडून शोधून काढील, त्याच्या मदतीने तो शत्रूत भेद करण्यास सुरूवात करील. राजा त्याच्या प्रतिस्पर्ध्याच्या जाळ्यात सापडणार नाही असें पाहिल. शत्रूसुद्धा असेंच डावपेच करत असतो त्याचे भान ठेवून तो त्याचे डाव शोधण्याचा प्रयत्न करील. जो राजा त्याच्या शत्रूच्या पुढे पांच पावलं असतो तोंच बाजी मारत असतो. एकमेकांना अडकवण्याचा खेळ राज्य कारभाराचा एक अविभाज्य हिस्सा असतो. राजा त्याचे कुटील कारस्थानी डाव सगळ्यांशी बोलणार नाही. त्यासाठी त्याचे खास लोक असतील. त्याच्या कुटील नितिचा बभ्रा झाला नाही पाहिजे. राजाच्या कामात गुप्ततेला फार महत्व असते. आक्रमण करण्या आधी राजा त्या राज्यात फंदफितुरी करण्यास सुरूवात करील. त्यासाठी त्या राज्यातील वादांचा तो उपयोग करेल. त्यांच्यात भांडणं लावून तो त्यांच्यात फुटीरता निर्माण करेल. त्यानंतर त्या राज्यावर स्वारी करणे सोपे होते. जिंकलेल्या राज्यात आपल्या राज्याच्या चालीरिती (धर्म, संस्कृती, भाषा इत्यादि) पसरवून तो त्या राज्याचे स्वरुप त्याच्या राज्यासाठी सोईस्कर करून घेईल. तसे केले कीं, तो प्रांत त्याचाच रहातो. सर्व डावपेंच करतांना त्याचे दूत फार सवध असतील.

जिंकलेल्या राजांवर तो फार भिस्त ठेवणार नाही. जे लोक चंचल प्रवृत्तीचे आहेत त्यांच्यावर तो मोठ्या जबाबदार्या टाकणार नाही. राजा फार ममताळू नसेल व फार कठोरसुद्धा नसेल. परंतु, राजाबद्दल धाक वाटेल असे त्याचे वर्तन असावे. एकावेळा एकाच शत्रूशी तो लढेल. एकएक करून ते फुटीर केलेले प्रतिस्पर्धी तो संपवून टाकेल. उरलेले लहान तो मैत्रीच्या व मदतीच्या धोरणांनी स्वताच्या कह्यात घेईल. शत्रूंची एकी

होणार नाही असे तो पाहिल. त्यासाठी एकाशी दोस्ती ठेवून इतरांचा काटा काढल्यानंतर मग तो त्या शत्रूचा काटा काढेल. राजा मंत्र सामर्थ्य असलेले ब्राह्मण बाळगेल व त्यांच्या मदतीने शत्रूची फळी कमजोर करण्याचा प्रयत्न करील. त्या मंत्रांच्या मदतीने राजा शत्रूच्या राज्यात अस्मानी संकट आणण्याचा प्रयत्न करील.

राजाच्या सैन्यात सहा प्रकारची बळस्थान असतील. ती अशी, पायदल, घोडदल, हत्तीदल, रथदल, खजिना आणि व्यापारी. त्यांना बाजार बुणगे म्हणतात. अशी पूर्ण तयारी असलेले लष्कर सहसा मार खात नाही. आपली संस्कृती, भाषा, धर्म ह्यांचा शस्त्रासारखा उपयोग करून प्रतिस्पर्धी राजाची अस्मिता तो संपवून टाकील. त्यासाठी राजाचे प्रशिक्षित लोक ते काम करतील. त्याच वेळी तो त्याच्या राज्याची अस्मिता मजबूत करण्याकडे लक्ष ठेवील. ज्या देशाची प्रजा साक्षर आहे ते जिंकणे सोपे नसते.

इंद्र बृहस्पतीला विचारतो खट्याळ माणसाची पारख कशी करावयाची. म्हणजे त्याच्यावर लक्ष देता येईल. खट्याळ माणसाची ओळख अशी कीं तो मागे टिका करतो. तसेंच जो द्वेष करतो सगळ्या लोकांचा, तो सगळ्यात नीटपणे सामील होत नाही. त्याच्या हालचाली, त्याचे पहाणे, डोके हलवणे हे सगळे त्याच्या मनातील अढी स्पष्ट करत असतात. कोणाबद्दल कधी चांगले बोलत नाही. तो सगळ्याच बाबतीत नाराज असतो. त्याचे कोणाशीच पटत नाही. खट्याळ माणसाचे वागणे स्पष्ट जाणवणारे असते. ते तो लपवू शकत नाही. मी तुला सगळे सांगितले आहे. त्याचा उपयोग करून तू तुझ्या शत्रूंचा पराभव करू शकशिल.

भिष्म सांगतात युधिष्ठीराला कीं, बृहस्पती व इंद्रात असे संभाषण झाले. त्याप्रमाणे तू सुद्धा करून तुझे राज्य वाढवू शकशिल.

शांता पर्व भाग एकशे दोन संपला.

# शांती पर्व
## भाग एकशे तीन

युधिष्ठीर विचारतो, सुख प्राप्तीसाठी राजा कसे प्रयत्न करील ज्याचे धन व सैन्य त्याच्या ताब्यात नाही.

भिष्म सांगतात, ह्यासाठी मी तुला एक प्राचीन कथा सांगतो. ती क्षेमदर्शिनची आहे. जी नेहमी सांगितली जाते जेव्हां असा प्रश्न पुढे येतो. क्षेमदर्शिन राजा फार वाईट परिस्थितीत असतांना तो त्याचे गुरू कलकवृक्ष्यांना तसे विचारतो. "गुरू महोदया, मला सांगा, मी माझे राज्य घालवून बसलो आहे अशा वेळी मी धन कसे मिळवावयाचे? मला आत्महत्त्या करण्या शिवाय दुसरा मार्ग दिसत नाही". चोरी, दरोडेखोरी अथवा भीक मांगणे ह्याशिवाय मी दुसरे काय करू शकतो ते सांगा. आपल्या सारखा जाणकार मला त्या अवस्थेतून बाहेर निघण्याचा मार्ग सांगू शकेल असे मी समजतो. माणसाने त्याच्या इच्छांचा त्याग करावा असे सांगतात परंतु, निव्वळ जगणे ह्याला इच्छा लागत नाही कारण ते आपल्यावर आपल्या भाग्याने लादलेले असते, इच्छा नसूनही माणूस जगत असतोच. आनंद व शोक नसले तरी तसे तो जगत असतोच. मला मात्र ऐहीक सुखासाठी संपत्ती पाहिजे. परंतु, ते केवळ स्वप्न बनून राहीले आहेत. जे त्यांच्या संपत्तीचा त्याग करतात ते फार मोठे असतात परंतु, माझ्याकडे त्याग करण्यासाठी संपत्ती नाही. मी संपत्ती नसल्याने निराशामय जीवन जगत आहे. ह्या परिस्थितीतून मी कसे बाहेर निघावे त्यासाठी कांहीं सांगा. कोसलच्या राजाची ती विनंती ऐकल्यावर कलकवृक्ष्य बोलतात, "मला वाटते तुला जीवनाचा अर्थ समजू लागला आहे. तू जसे समजतोस तसेंच आहे हे जग. जे कांहीं आहे ह्या जगात ते सगळे क्षणभंगूर आहे. जे अस्तित्वात आहे असे वाटते ते प्रत्यक्षात अस्तित्वात नसते. हे जे लोक समजतात त्यांना सुख व दुःख ह्याने बाधा होत नाही. कारण सुख व दुःख ह्या माणसाच्या कल्पना असतात. प्रत्यक्षात तसे कांहींही नसते. सगळा भ्रम असतो. जेव्हां हे तुला मनोमन समजते तेव्हां सुख व दुःख ह्या गोष्टींपासून तू मुक्त होशिल. मानलं तर सुख व नाही मानलं तर दुःख अशी मनाची अवस्था तुला प्राप्त होईल. जे कांहीं तू मिळवलेस व जे

घालवलेस ते सगळे नाहीसे होईल. असे झाले कीं मग शोक करण्यासारखे कांहीं रहात नाही. शोक करून तुझे गेलेले परत येणार नाही. म्हणून प्रथम तू ते गेले म्हणून जो शोक करत अहेस ते थांबव. शोक करण्याने माणसाची कार्यक्षमता कमी होते म्हणून तशा मध्ये राजाने त्याचा समय व्यर्थ घालवू नये. तुझे पूर्वज आता कोठे आहेत? ते तुला दिसत नाहीत. तुझ्या दुर्भाग्यासाठी तू त्यांना कशाला दोष देत आहेस? हे भ्रामाचे चक्र असे आहे कीं, आपले अस्तित्वसुद्धा आपल्याला नाकारावे लागेल. जे धन तुझे आहे असे तू समजत होतास ते आता तुझे नाही त्याचे कारण सुद्धा तेंच आहे. ज्याच्याकडे ते गेले म्हणून तुला खेद होत आहे तो तरी कोठे रहाणार आहे? मग त्या बद्दल शोक कशासाठी करावा? जे मिळते ते वस्तुतः तुझे कधीच नव्हते. तरी ते तुझ्याकडे आहे त्याचे कारण त्याच्या व्यवस्थेची जबाबदारी ब्रह्मांने तुझ्यावर टाकली आहे. ती तू कशी पार पाडत आहेस हा खरा प्रश्न असतो. तुझे भाग्य जे तूंच घडवत असतोस ते सर्वश्रेष्ठ असते. जे हे समजून असतात ते ज्ञानी समजले जातात. ते तुझ्या सारखे शोक करत नसतात. राज्य आले काय व गेले काय त्यांना त्याची चिंता नसते. राजा क्षेमदर्शिन बोलतो, जे राज्य मला वारसांने मिळाले ते मी स्वकष्टाने मिळवलेले नव्हते. तसेंच ते माझ्या हातातून नियतिच्या मर्जीनुसार गेले आहे. आता मी इतरांच्या दयेवर जगत आहे. ऋषी त्याला सांगतात, तुला जे समजले आहे त्याप्रमाणे गेल्याचा शोक न करता नवीन कसे मिळवावयाचे त्याचा विचार करण्यास सुरूवात कर. जे मिळवणे शक्य आहे त्याचाच तू ह्यापुढे विचार करशिल. तो मूर्ख समजला जातो जो जे गेले त्यावर शोक करत रहातो. तो त्या लोकांचा द्वेष करतो कारण ते आता समृद्ध आहेत. अरे राजा, तू तसा नाहीस. तुझ्याकडे हिम्मत आहे. तुझ्या हिम्मतीने तू पुन्हा समृद्धी प्राप्त करणार आहेस. तुला पुन्हा संधी मिळणार आहे त्याची वाट पहात रहा. संपत्ती मिळवण्याच्या हव्यासामुळे तू इतर गोष्टींकडे दुर्लक्ष करू नकोस. तू जे पुण्य मिळवत आहेस ते तुला मार्ग दाखवणार आहे. कारण पुण्यातूनच समृद्धी येत असते. माणसाला जीवन ब्रह्माने दिले आहे ते पुण्य कमावण्यासाठी, समृद्धी कमावण्यासाठी नाही हे लक्षात घे. पुण्य घालवून समृद्धी मिळवणारे कायमचे बरबाद होत असतात. माणसावर येणार्या संकटांचा तोंच कारक असतो. त्याच्याच चुकीच्या कर्मामुळे तो अडचणीत सापडत असतो.

तुझ्या कोणत्या चुकांमुळे तुझी अशी अवस्था झाली आहे त्याचा अभ्यास करण्यात तू जास्त समय खर्च केलास तर बरे होईल, केवळ शोक करण्याने कांहींच साध्य होणार नाही. आलेल्या अपयशाने तू जोगी बनण्याचे विचार करत असशील तर ते सुद्धा तुला शोभणार नाही. ते केवळ दंभ ठरेल. त्यामुळे तू पुण्य घालवून पाप मिळवत रहाशिल जे योग्य नाही. त्यासाठी पुन्हा उभा रहा व नव्याने प्रयत्नाची पराकाष्ठा करण्याचा निर्धार कर. तुझ्या दैवाला पुन्हा आवाहन करून सुरूवात कर.

शांती पर्व भाग एकशे तीन संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे चार

कलकवृक्ष्य पुढे सांगतात, "अरे राजा जर तुला वाटत असेल कीं, तुझ्यात श्रात्रतेज आहे तर त्यानुसार काय करावयाचे म्हणजे तू पुन्हा तुझे राज्य प्राप्त करू शकशिल. ऐक मी काय सांगतो ते, आता मला सांग तुझी ते ऐकण्याची तयारी आहे कां"?

राजा बोलतो, "मला ते सगळे सांगा अहो महामुनी, मी त्याप्रमाणे सगळे करणार आहे. आपली ही भेट चांगली होईल त्यामुळे".

ऋषी सांगू लागतात, मिथ्या अहंकार, फाजिल वासना, क्रोध, हर्ष आणि भीती जे आपले खरे दुष्मन असतात त्यांचा प्रथम तुला त्याग करावा लागेल. तू त्या निर्धाराने मिथिला नगरीच्या राजाकडे, जनकाकडे मदत मागण्यासाठी जा. तो तुला जरूर मदत करेल. त्याला माझे नाव सांग. तो तुला त्याचा उजवा हात करेल. त्याच्या लोकांचे मन तू जिंकशिल, त्यामुळे तुला अनेक चांगले दोस्त मिळतील, त्यांच्या मदतीने तू समृद्ध होशिल, त्यानंतर तू तुझ्या राज्यातील शत्रूपक्षात दुफळी माजवू शकशिल. त्याची शक्ती तू नष्ट करशिल. तू तुझ्या वैर्यांना खूबीने अनेक प्रकारच्या व्यसनांत अडकवशिल. जसे द्युत, नशा, मद्य, बायका, महागडे यज्ञ वगैरे. ते त्यात अडकले कीं, त्यांचा नाश ती व्यसनं करतील, तुला कांहीं करावे लागणार नाही. त्याच्याशी तुला उघड वैर न दाखवता उलट मित्र असल्याचा बहाणा करत तू त्यांना त्या व्यसनांत आणखीन गुंतवून ठेवून त्यांचा पुरता नाश करून मग तुझे राज्य प्राप्त करू शकशिल. त्यांच्या दुष्मानाशी तू चांगले संबंध ठेवून त्यांच्यातील शत्रूत्व कसे जास्त वाढत जाईल त्याची व्यवस्था करशिल. ते त्यांच्या व्यसनानी त्यांचे खजिने संपवतील असे करावे लागेल त्यामुळे ते कमजोर होतील. तुझ्या शत्रूंना मोठे महागडे यज्ञ करण्यास भाग पाडशिल, ज्यामुळे ते आणखीनच गरीब होतील. ब्राह्मणांना दानं करावयाला लावशिल. अशा प्रकारे ते निर्धन होतील. त्या कामात तुला यज्ञ करणारे ऋद्विज मदत करतील असे पहा. तू मात्र त्याच ब्राह्मणांना तुझ्यासाठी व्रतवैकल्ये आणि तपस्या स्वस्त्यात करण्यास करावयाला सांगशील. त्याने तुझे आत्मबळ वाढेल व पुढील

कारवाया तू अधिक चांगल्या प्रकारे करशिल. तुझ्या वैर्यांचे खजिने रिकामे झाल्यावर ते तुला शरण येतील. ह्या सगळ्या क्लुप्त्यांना मुत्सद्देगिरी असे म्हणतात. ते असे शस्त्र आहे जे युद्धापेक्षा जास्त किफायतशीर असते. माणसाची सगळी सुखं त्याच्याकडे असलेल्या संपत्तीवर अवलंबून असतात. जास्त संपत्ती मिळावी म्हणून काम न करता जे यज्ञयागात त्यांचा समय व संपत्ती खर्च करतात ते लवकरच बरबाद होतात. राजांमध्ये विविध यज्ञ करावयाची व्यसनं असतात त्यांचा तू उपयोग करून तुझ्या शत्रूचे खिसे खाली करून टाक. वस्तुतः यज्ञ केल्याने कांहींच मिळत नसते पण ब्राह्मण त्यांच्या सोयीसाठी राजांना तसल्या कर्मकांडांत ढकलत असतात. तेंच तू करशिल. कोणतीही देवता (लोकपाल देवता) केवळ यज्ञ केल्याने कधींच प्रसन्न होत नसते. त्यांना प्रसन्न करण्यासाठी सच्चा सेवेची आवश्यकता असते. परंतु, कृतयुगापासून ते यज्ञाचे व्यसन राजांना धूर्त ब्राह्मणांनी लावले आहे त्याचा तू समजून तुझ्या फायद्यासाठी उपयोग कर. तुझे वैरी त्यानंतर निष्कांचन झाल्यामुळे वनात जातील व तुला तुझे राज्य युद्ध न करता प्राप्त होईल. त्यानंतर तू उपलब्ध असलेली जडीबुट्टी वापरून तुझ्या वैर्याच्या लोकांना वीष बाधा करून मारून टाकशिल. तशी प्राचीन पद्धती आहे शत्रूला नष्ट करण्याची, ती तुला तुझे ब्राह्मण शिकवतील.

त्या नंतर मात्र तू वेसावध न रहाता तुझ्या राज्याची चांगली सेवा करशिल व लोकांचे दुवा मिळवून सुखांने राज्य करशिल.

शांती पर्व भाग एकशे चार संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे पांचवा

राजा ते ऐकल्यावर बोलतो, मी पाप मार्गाने म्हणजे चोरून अथवा फसवून कांहीं करू इच्छित नाही. तशी संपत्ती मला नको. पुण्य मार्ग ज्यात सगळ्या चांगल्या लोकांचे भले आहे, ज्याबद्दल कोणी आक्षेप घेणार नाही. मी ह्या जगात एका सज्जन माणसाचे जीवन जगू इच्छित आहे. मी त्या करता आपण सांगत असलेले कपट कारस्थानी कृत्य करू शकणार नाही. मला दुसरा कोणता मार्ग सांगा जो माझ्या प्रवृत्तीत असेल.

ऋषी त्यावर बोलतात, "अरे क्षत्रिया, तुझ्या बोलण्याने तू पुण्यमार्गी आहेस हे मी समजलो. तुझ्यात जर रजोगुण अथवा तमोगुण असते तर तू मी सांगितलेला मार्ग स्वीकारला असतास. पण तू सत्त्विक प्रवृत्तीचा असल्यामुळे ते तुझ्याने होणार नाही. मी तुला त्या प्रकारचा मार्ग सांगतो ज्याने तुझे भले होईल. मी तुमची भेट करून देईन जनक राजाशी ज्यामुळे तुम्हा दोघांचे भले होईल. कोणाला असा मंत्री आवडणार नाही जो जात्या सत्त्व प्रवृत्तीचा आहे. पुन्हा राजवंशाचासुद्धा आहे. ज्याच्यात फक्त सात्त्विक प्रवृत्ती आहे. ज्याच्यात क्रौर्य नाही, जो पापकर्म करू इच्छित नाही, ज्याला राज्यशासनाचा चांगला अनुभव आहे, ज्याला लोकसंपर्क करण्याची कला अवगत आहे, विशेष म्हणजे तुझे राज्य गेले तरी त्याच्यामुळे तू तुझे सज्जनपण सोडण्यास तयार नाहीस असे सहसा आढळत नाही. साधारणपणे माणसाचे चांगले वागणे त्याच्या सुस्थितीमुळे असते. परिस्थिती बिघडली कां त्याचा चांगुलपणा नाहीसा होतो पण तुझे तसे झालेले नाही. हे तुझ्या व्यक्तिमत्वाचे मला विशेष वाटते. तुझे सद्‌गुण वरवरचे नाहीत, ते अंतर्यामी आहे. विदहचा राजा जनक तुझ्या सारखाच आहे, तो माझ्या आश्रमाकडे येणार आहे मला भेटावयाला, तेव्हां मी तुझी व त्याची ओळख करून देईन". असे भिष्म सांगतात. पुढे ते सांगतात कीं, जनक राजा शुद्ध चारित्र्याचा व पवित्र प्रवृत्तीचा आहे, त्याची आणि क्षेमदर्शिन राजाची चांगली जमेल असे ते बोलतात. चांगला सत्शिल मंत्री असल्याशिवाय राज्य तीन दिवससुद्धा चालवणे मुष्किल असते. मंत्री धाडशी व बुद्धीमान असला पाहिजे. ह्या दोन गुणांनी तो सगळे जग जिंकू शकतो. राजा

होण्यासाठी ह्या दोन गुणांची आवश्यकता असते. जनक राजाकडे सध्या तसा सांगता येईल असा मंत्री नाही. खरा क्षत्रिय जो पापशक्तींचा पराभव करण्याचे काम करत असतो आणि नाही तो जो त्याच्या धाडसाचा व बुद्धीमत्तेचा चुकीच्या उद्देशासाठी वापर करतो. अरे राजा, तू कधीही तुझ्या क्षात्र कर्तव्याला सोडणार नाहीस. लोभ आणि मोहाच्या प्रेरणेने तू कांहीं करणार नाहीस. युद्धात कोण जिंकते ते सांगता येणार नाही कारण ते भाग्यावर अवलंबून असते. म्हणून सामोपचाराने वाद मिटवणेच श्रेयस्कर असते शहाण्या राजाकरता. तरी प्रसंग आला तर मागे न हटता तू युद्धास तयार झाला पाहिजेस. आपण क्षत्रिय आहोत म्हणून लढलेंच पाहिजे असे नसते. क्षात्र कर्तव्य साम, दाम, दंड आणि भेद ह्या मुत्सद्देगिरीत सुद्धा तितकेच असावे लागते. जेव्हां हे चार कुचकामी ठरतात तेव्हां मात्र युद्ध करावयाचे असते तेसुद्धा, जशास तसे, ह्या धोरणांने करावयाचे असते. ते ऐकल्यावर जनक राजा त्या ऋषीला बोलतो कीं, आपण जाणकार अहात, आपण जे ठरवाल ते आम्हा दोघांच्या भल्याचेच असणार ह्यात संशय नको. त्यानंतर विदेहचा राजा कोसलच्या राजाला बोलतो, तुझ्या गुणांची तारीफ मी कलकवृक्ष्या कडून ऐकली आहे त्यामुळे मी फार प्रसन्न झालो आहे. जरी मी जग जिकले असले तरी आज तू तुझ्या उत्तम गुणांनी मला जिंकले आहेस. जर तुला संकोच वाटत नसेल तर तू माझ्याबरोबर ये. आपण एकत्र राहून कामं करू. माझ्याबरोबर रहातांना तू स्वताला आश्रित समजू नकोस, स्वताला एक जेता समजून माझ्या बरोबर रहाशिल. आता तू माझ्या बरोबर माझ्या घरी येणार आहेस मिथिला नगरीस.

ऋषी कलकवृक्ष्यास प्रणाम करून ते निघतात. मिथिलेत राजा कोसलाचे चांगले स्वागत होते. तेथे त्याचे पाय धूतले जातात, त्यानंतर मध, दही आणि दुधाने त्याचे स्वागत केले जाते. तेथे राजा जनक त्याच्या कन्येची ओळख करून देतो क्षेमदर्शिन बरोबर. तेथे तो राहू लागतो. समाजात शांतता राखणे हे राजाचे काम असते ते जनक राजा उत्तम प्रकारे करत असतो.

शांती पर्व भाग एकशे पांचवा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे सहावा

युधिष्ठीर बोलतो, आपण क्षत्रियाची कर्तव्ये कोणती ते सांगितले. त्याचे वागणे कसे असावे त्याबद्दल सुद्धा सागितले, त्याच्या उदर निर्वाहाबद्दल सांगितलेले नाही. त्याशिवाय खजिन्याची व्यवस्था कशी असावी, चार वर्णाच्या लोकांचे परस्पर संबंध कसे असावेत ते सांगितले. कर कसे लावावेत, कसे लावू नयेत, युद्ध कसे व केव्हां करावे जिंकल्यावर तो कसा वागेल, मंत्री कसे असावेत, त्यांची निवड कशी करावी, राजाचे सहा स्तंभ कसे असतात, दुर्जनांशी कसे वर्तन ठेवावे, सज्जनांशी कसे, बरोबरीच्या व कमी प्रतीच्या लोकांचे संबंध कसे असावेत, राजाने प्रजेशी कसे वागावे, कशा प्रकारे राजा व त्याचे क्षत्रिय बलहीनांचे संरक्षण करील. असे सगळे आपण मला सांगितले आहे. जसे पवित्र ग्रंथांत सांगितले आहे तसे सांगितले आहे. राजाने कोणाशी व कां शत्रूत्व करावयाचे तेसुद्धा सांगितले. आता मला सांगा राजा त्या अनेक बलवान योद्ध्यांशी कसा वागेल. ते राजाशी प्रामाणिक रहातील ह्यासाठी राजाने काय केले पाहिजे. जिंकलेल्या शत्रूच्या मनातील अढी कशी दूर करावयाची जेणेकरून तो मित्र होईल व पुढे उपयोगी येईल. शत्रूंच्या संघटना भेदनितीने तोडण्याचे सांगितले आहे. राजा त्याच्या योजना पूर्णतया गुप्त कशा राखू शकेल ह्या बद्दल मला शंका आहे. जी गोष्ट अनेक कानांवर जाते ती गुप्त राखणे सोपे नसते. त्याबद्दल सांगा.

भिष्म सांगतात, राजा व त्याची खानदान (राजाचा परिवार) ह्यात द्वेष आणि क्रोध होण्याने कांहीं प्रश्न उत्पन्न होत असतात. त्यातून शत्रूत्वाची भावना वाढत असते. राजा लोभी झाला तर ते होण्याची जास्त शक्यता असते. त्यामुळे दोघांचे नुकसान होत असते. त्यासाठी चांगले संबंध त्यात रहावे असे त्या सगळ्यांनी वागावयाचे असते. केवळ कोणी एकच तसे वागून चालत नाही. नजराणे, दानं, बक्षिशी, भेटीगाठी, सलोख्याचे इतर प्रकार त्यासाठी कामी येतात. हे झाले चांगले मार्ग, वाईट मार्गात त्यांची ताकद कमी करण्यासाठी अप्रत्यक्ष कारवाया करावयाच्या असतात. त्यासाठी त्यांच्यातील कमजोर कडी कोण ते पहावयाचे असते. त्याच्या मदतीने ते साध्य होत असते. बर्याच वेळी राजाचा परिवार एकत्र येऊन एक फळी करतो व तो राजाला अडचण

करत रहातो. कांहीं कारणांने ते राजावर नाराज असतात. कांहीं वेळा ते शत्रूपक्षाला मिळण्याचा धोका असतो. अशी खानदान संघटीत असणे एकापरीने राजा व राज्यासाठी चांगले असते जेव्हां ते एकजुटीने त्यांची कामं करतात. त्यांच्यात फाटाफूट राज्यासाठी चांगली गोष्ट नसते. ज्या राज्यात खानदान राजाला विरोध करू लागते त्या राजाचे शत्रू त्याचा पुरेपुर फायदा घेऊ शकतात. अशावेळी राजाचे सल्लागार राजाला सावध करतात. त्या परिवारातील शहाणे लोक मतभेद फार ताणून न घेता ते सोडवण्याचा प्रयत्न करतात. ती खरी योग्य पद्धत आहे. जेव्हां कोणताही परिवार (केवळ राजाचाच नाही तर) एकत्र नांदत असतो त्यांची ताकद पाहून इतर लोक त्यांच्याशी दोस्ती करण्याचा प्रयत्न करतात. परंतु, जर ते एकमेकांशी भांडत आहेत असे दिसले तर इतर लोक त्यांच्याशी दोस्ती करणे उचीत समजत नाहीत. मृदू संभाषण, चांगला सल्ला देणे, प्रेमळपणा अशा धोरणांनी बरेच प्रश्न सुटत असतात. संपत्तीची सारखी वाटणी करण्याने सुद्धा ते शक्य होत असते. मानपान देण्याने कांहीं दोष निकालात निघतात. कोणी कोणाला त्याच्या कमजोरीसाठी खिजवणार नाही. मदत करतांना उपकार केले असे दाखवणार नाही. जेव्हां खानदान एकत्र काम करते ते सगळे जग जिंकू शकतात. अशी चांगली खानदान फुटावी म्हणून त्यांचे शत्रू त्यांच्यात मत्सर, द्वेष अशा भावना उत्पन्न करण्याचा प्रयत्न करत असतात. त्यावर चांगले लक्ष ठेवण्यासाठी राजाचे हेर काम करतात. प्रतिष्ठेचे प्रश्न होणार नाहीत असे पहावयाचे असते. त्यासाठी सगळ्यांना सतर्क रहावयाचे असते. एकमेकांतील अयोग्य चढाओढीने खानदान बरबाद होत असते. राजाचे वागणे शांततेचे असेल. त्याच्या चिडण्याने परिस्थिती झपकन बिघडू शकते. धूर्त मध्यस्थी काम करतील मतभेद मिटवण्यासाठी. राजाचे धोरण असे असले पाहिजे कीं, तो प्रथम प्रजेचे भले कशात आहे ते पाहिल नंतर त्याच्या परिवाराचे असे धोरण ठेवल्यांमुळे प्रजा राजाच्या बाजूला असेल. खानदानीतील शहाणे कोणताही प्रश्न उत्पन्न झाल्यावर त्वरित तो सोडवतील. प्रश्न चिघळले कीं, ते सोडवणे अवघड होते. क्षुल्लक कारणाने सुरू झालेले वाद अनेक राजघराणी नामशेष करण्यास कारणीभूत झाली आहेत. राजाची गुणवत्ता बरेच प्रश्न सोडवण्यात मदत करतात कारण कांहीं वेळा त्या उच्च

दर्जाच्या वागण्यामुळे खानदानीतील लोक राजाला वचकून रहातात. राजाचे शत्रू त्याच्या खानदानीतील कमजोर कडी हातात घेऊन त्याला शह देऊ शकतात.

भिष्म पुढे सांगतात, आता माणसाच्या उदरविर्वाहाबद्दल काय नियम जनक राजाने त्याच्या विदेहात अमलात आणले ते सांगतो. कोसलचा राजा जनकांना विचारतो कोणत्या वर्णाने कोणता आहार करावा व तसा कां करावा ते सांगा. जनक राजा सांगतो, त्याच्या विदेहात जे नियम आहेत ते ऐक, ब्राह्मणांना बुद्धीचे काम करावे लागते त्यात पांच प्रकारच्या प्रज्ञा आहेत. त्या अशा, विचार करण्याची, स्मरण करण्याची, विश्लेषण करणारी, निर्णय घेणारी, नवीन कल्पना करणारी. त्यासाठी ब्राह्मणांना गाईच्या मांसाचा आहार करण्याचे सांगितले आहे. कारण त्या मांसांत ते सगळे आहे जे माणसाला त्या पांचही बुद्धी विकसित करण्यात मदत करतात. लहान प्राण्याच्या मांसात (शेळी, मेंढी, ससा इत्यादि) ते फार कमी प्रमाणात असते म्हणून मोठे प्राणी जसे गोवंश, वृषभ (डुक्कर), घोडा, उंट आहेत ते खावयास सांगितले आहेत ब्राह्मणांना. क्षत्रियांना बुद्धीप्रमाणे शारीरीक कष्ट करावे लागतात म्हणून त्यांच्या आहारात शाकाहार समाविष्ट करावा असे सांगितले आहे. वैश्यांना क्षत्रियांप्रमाणे मांसाहार व शाकाहार करण्याचे सांगितले आहे. शुद्रांना जास्त अंगमेहनत करावी लागते म्हणून त्यांना जास्त करून शाकाहार करावयास सांगितले आहे. त्या प्रमाणे चार वर्णांचे लोक त्यांचा आहार ठेवतात व त्यामुळे ते आपापली कामं उत्तम प्रकारे करत असतात. मल्लयोद्धे, तलवार चालवणारे, धनुर्धर, अशा क्षत्रियाना शुद्रा प्रमाणे जास्त शाकाहार सांगितला आहे. जे वैश्य दुकारदारी करतात त्यांना बुद्धी जास्त चालवावी लागते म्हणून ते जास्त मांसाहार करतात. म्हणजे कोणाला कसे काम करावे लागते त्याप्रमाणे त्यांचे आहार सांगितले आहेत. शुद्र बुद्धीचा वापर कमीत कमी करतात म्हणून त्यांना जास्त शाकाहार सांगितला आहे. शाकाहार माणसाचे शरीर कणखर व शक्तीमान करते म्हणून तो आहार त्यांना सांगितला आहे. ब्राह्मणांना जास्तीत जास्त बुद्धीची कामं करावी लागतात म्हणून ते जास्त मांसाहार करतात. त्यांच्या आहारात शाकाहार कमी असतो. परंतु, कलीयुगात ब्राह्मण शुद्र होतात म्हणून ते जास्त शाकाहार करतील असे जनक राजा सांगतो.

युधिष्ठीर विचारतो, त्यांची प्रमाणं कशी असावीत ते सांगा.

भिष्म सांगतो, जनक राजा सांगतो कीं, ब्राह्मण आठ भाग मासाहार व दोन भाग शाकाहार करतील. त्यात गाईचे मांस विशेष असेल. क्षत्रियांच्या आहारात चार भाग मांसाहार व सहा भाग शाकाहार असेल. वैश्यांच्या आहारात जे फिरून धदा करतात अथवा कृषीची कामं करतात ते तीन भाग मांसाहार व सात भाग शाकाहार करतील. जे बसून हिशोबांची कामं करतात ते क्षत्रियांप्रमाणेच त्याचा आहार ठेवतील. शुद्र व पाईक सैनिक आठ भाग शाकाहार व दोन भाग मासाहार करतील.

ब्राह्मणांच्या शाकाहारात फळं आणि उकडलेली कंदमुळं असतील. क्षत्रियांच्या शाकाहारात फळं, हिरव्या पालेभाज्या, धान्याचे पदार्थ जसे चपाती, कडधान्याच्या उसळ वगैरे असतील. वैश्यांच्या आहारात तसाच भाग असेल. शुद्रांच्या आहारात भाज्या, फळं, चपात्या, भात, डाळींची वरणं, असे विविध शरीराला ताकद देणारे शाकाहार असतील.

विद्यार्थी जे गुरूकडे शिकतात ते ब्राह्मणांचाच आहार ठेवतील. महिला त्यांच्या पुरूषांचाच आहार ठेवतील. लहान मुलांना ब्राह्मणांचा आहार द्यावयाचा असतो मग तो कोणत्याही वर्णाचा असो. रुचीनुसार कोणीही त्याचा आहार निवडण्याचे स्वातंत्र्य लोकांना असते मिथिला नगरीत असे जनक राजा कोसलच्या राजाला सांगतो.

शांती पर्व भाग एकशे सहावा संपला.

# शांती पर्व
## भाग एकशे सातवा

युधिष्ठीर विचारतो, कर्तव्याच्या अनेक शाखा असतात. त्यातील कोणती कर्तव्ये जास्त महत्वाची असतात ते सांगा. त्याची माहिती मला द्या त्याप्रमाणे मला समजेल मी कसे काम करावे म्हणजे माझे ह्या आणि नंतरच्या जगात भले होईल.

भिष्म सांगतात, माता पिता व गुरू ह्यांची पुजा करणे महत्वाचे असते माझ्यामते. जो त्याच्या ह्या जन्मात ते करतो प्रामाणिकपणे त्याचे त्या जगातसुद्धा भले होत असते. कारण ह्या तिघांची पुजा म्हणजे ब्रह्माची पुजा करण्यासारखे असते. ह्या तिघांच्या रुपाने ब्रह्म माणसाला प्रत्यक्ष भेटत असते असे ऋषी सांगतात. पिता म्हणजे गृहपत्य अग्नी असतो, माता दक्षिणा अग्नी आणि गुरू म्हणजे तो अग्नी ज्यावर तुपाचे अर्घ्य करावयाचे असते. पित्याची सेवा करणारा ह्या जगात यशस्वी होतो, मातेची सेवा करणारा पुढच्या (मृत्यूनंतरच्या) जगात सुखी होतो व गुरूची सेवा करणारा ब्रह्माला मिळतो. म्हणून त्यांच्याकडे कधीही दुर्लक्ष करू नकोस. त्यांना जेवण दिल्यानंतर तू जेवशिल. त्यांच्यावर रागावणे हे मोठे पाप कर्म असते ते कधी करू नकोस. त्यांच्या प्रसन्नतेत तुझे सगळे पाप धुतले जात असते. पुण्य मिळवण्याचा तो मोठा व साधा मार्ग ब्रह्माने माणसासाठी ठेवला आहे. जो त्यांच्याशी गैरवर्तणूक करतो तो बरबाद होतो. त्यांच्या सुखासाठी जे तू त्याग करशिल त्याच्या कित्येकपट तुला परत मिळत असते. इतके ते तिघे थोर असतात. कारण ते ब्रह्माचे अंश मानले गेले आहेत. त्या तिघांत मातेचे स्थान मोठे असते. परंतु, माझ्या मते (भिष्माच्या मते) गुरू सर्वात जास्त श्रेष्ठ असतो. असे मला वाटण्याचे कारण माता व पिता शरीर देतात परंतु, त्याला ज्ञान गुरू देतो ज्याच्या शिवाय त्या शरीराला कांहीं महत्व नसते. त्याचे शरीर केव्हां तरी नष्ट होते परंतु, जे ज्ञान त्याला मिळाले ते त्याच्या (आत्म्याच्या) बरोबर अनंत काळ रहाणारे असते. माता पिता कितीही वाईट वागले तरी त्यांना तू शिक्षा करणार नाहीस कारण तो अधिकार मुलाला नसतो. जो तुम्हाला जगाचे ज्ञान देतो जे नित्य आहे, तो तुमचा मायबाप असतो. म्हणून गुरू त्या तिघात श्रेष्ठ असतो असे माझे मत आहे. त्याचा

आज्ञाभंग करणे भृणहत्त्या करण्यासारखे महापाप असते. म्हणून त्या तिघांचा आदरपूर्वक सन्मान करणे हे माणसाचे पहिले कर्तव्य असते. जो त्या तिघांची सेवा त्यांच्या वृद्धपणी करण्याचे नाकारतो तो महापापी ठरतो. इतर कर्तव्यांचे मी नंतर सांगेन.

शांती पर्व भाग एकशे सातावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे आठावा

युधिष्ठीर बोलतो, माणसाने पुण्याचा मार्ग न सोडता त्याची विविध विलक्षण कामं कशी करावीत त्या बद्दल सांगा. हे जग खर्या व खोट्याने भरलेले आहे. त्यातल्या कोणत्या कर्मामुळे मनुष्य पुण्य कर्मी ठरतो व ते कां"? खरे व खोटे कसे ठरवले जाते, कशाला नित्य सत्य समजतात. कोणत्या परिस्थितीत माणूस खरे बोलेल व कोणत्या परिस्थितीत तो खोटे बोलेल ज्यांमुळे तो पुण्यमार्गी ठरेल"?

भिष्म सांगतात, साधारणपणे खरे सांगणे पुण्य कारक मानले जाते. कधी खोटे खर्याचे सोंग घेऊन येत असते. त्याच प्रमाणे कधी खोटे खर्याचे सांग घेऊन येत असते. त्यातून योग्य अयोग्य समजण्याला शहाणपण असे समजले जाते. बेसावध मनुष्य चांगुलपणा नसलेले खरे सांगतो व तो खोटा ठरतो. कारण पुण्याचा संबंध खर्या अथवा खोट्याशी नसतो तो असतो चांगुलपणा, माणूसकी व भूतदया ह्या तीन धोरणांशी. कारण जगात खरे अथवा खोटे असे कांहीं नसते. ज्यामुळे हे तीन राखले जातात ते पुण्यकारक असते. कधी खोटे करण्याने ह्या तिघांचे सिद्ध होत असते तेव्हां माणसाने ते खोटे करावे व पुण्य कमवावे. त्या तीन धोरणांना एकत्रितपणे "पुण्यमार्ग", असे समजतात. तरी त्याचे विश्लेषण करणे सोपे नसते. ब्रह्माने सांगितले आहे कीं, ज्यांमुळे सगळ्या चराचरांचे भले होते तो पुण्यमार्ग. परंतु, त्यातसुद्धा अनेक भेद आढळतात. एका चांगल्याच्या भल्यात दुसर्या चांगल्याचे बुरे होत असते अशावेळी काय करावे असा प्रश्न पडतो. त्यावेळी सापेक्ष हिताचा विचार करावा लागतो. समजा गरूड ससा खाणार आहे त्या सशाला वाचवले तर ते एकाच्या बाजूने पुण्य झाले परंतु, गरूडाच्या बाजूने ते पाप झाले कारण त्याला उपाशी रहावे लागले जे पाप कर्म होते. एकाच वेळी पाप व पुण्य होत असते. परंतु, जर मनुष्य त्या निसर्गाच्या व्यवहारात हस्तक्षेप न करेल व गरुड आणि ससा ह्यांचे भाग्य त्यांच्यावर सोडून राहिला तर तो नित्य सत्याचा कर्ता ठरेल. म्हणजे ज्या गोष्टी नैसर्गिक प्रकारे होत असतात त्यात माणसाने हस्तक्षेप करणे हे पाप समजले आहे. अशारितीने जर मनुष्य त्याची असहायता मान्य

करेल तर त्याला ते पाप लागत नाही. अशी बरीच उदाहरणं दिसून येतात जेथे मनुष्य कांहीं करू शकत नाही. म्हणून पाप अथवा पुण्य इतरांच्या कर्माशी निगडीत नसते हे लक्षात घेऊन त्याने स्वताच्या कर्माची तपासणी करावयाची असते. गरुड व ससा ह्यांना त्यांच्या भाग्यावर सोडून देण्यातच त्याचे पुण्य कर्म असते. पाप व पुण्य फक्त माणसाला लागतात. इतर प्राण्याना लागत नाहीत म्हणून गरुडाने ससा खाल्ला म्हणून त्याला पाप लागत नाही.

कांहीं सांगतात पुण्याबद्दल जे श्रृतीत दिले आहे ते अंतिम म्हणून मान्य करावे. परंतु, श्रृती स्वतः अंतिम नाही हेसुद्धा आपण लक्षात घेतले पाहिजे. पाप पुण्याचा संबंध माणसाच्या व्यवहाराशी असतो. उदाहरणार्थ, चोराने चौकशी केली व त्याला खरे सांगितले तर कोणाचे तरी नुकसान होणार असते म्हणून त्याला माहिती न देणे अथवा खोटी माहिती देणे हे जरी खोटे असले तरी ते चोरापासून कोणाला वाचवल्यामुळे खरे समजले जाते. ह्या ठिकाणी चोर पापकर्मी म्हणून त्यज्य समजला आहे व म्हणून त्याला साथ न देणे पुण्य कर्म होते. येथे सत्पात्र व अपात्र असे फरक लक्षात घेऊन खरे व खोटे काय ते ठरवावयाचे असते. त्यासाठी हित कोणाचे होणार आहे खरे सांगून ते पहावयाचे असते. त्या उदाहरणात खरे सांगितले तर चोराचे म्हणजे पापाचे हित होणार व म्हणून ते पाप ठरते. जीवनात असे बरेच प्रसंग येतात तेव्हां त्याचा विचार करून काय योग्य व काय अयोग्य ते ठरवावयाचे असते. वाईटांपासून संरक्षण मिळण्यासाठी (स्वताला किंवा दुसर्याला) खोटे बोलणे पुण्यकारक असते. म्हणजे खरे व खोटे ह्यांचा संबंध पुण्याशी सापेक्ष स्वरुपाचा असतो. जे हे समजून वागतात ते शहाणे समजले जातात. न्यायालयात साक्ष देतांना हा नियम वापरून चांगल्याचे संरक्षण साक्षीदार करू शकतो, खरे बोलून अथवा खोटे बोलून. त्यामुळे पाप लागत नाही. स्वताचा तसेंच दुसर्याचा जीव वाचवण्यासाठी खोटे बोलणे पुण्यकारक समजले आहे. चांगले काय व वाईट काय हे ओळखण्याची साधारण उपजत बुद्धी सामान्य माणसात असते त्याचा उपयोग करावयाचा असतो असे वेद सांगतात. राजासुद्धा त्याच उपजत बुद्धीने न्याय देतो. जेथे चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया ह्यांच्या विरुद्ध वागणे असते ते पापकारक समजले जाते. स्वार्थाने प्रेरित होऊन जे चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया सोडून वागतात

ते न्यायाच्या दरबारात दंडनीय समजले जातात. येथे राजा सारासार विवेकांने त्याचा निकाल देतो. स्वार्थासाठी इतरांचे वाईट करणारा दंडनीय असतो राजासाठी. अशांना शिक्षा करण्याने राजाला पाप लागत नाही. पाप करणार्याशी पापाने व पुण्य करणार्याशी पुण्य मार्गाने असे राजाचे, जशास तसे, ह्या न्यायाने वागणे असले पाहिजे.

शांती पर्व भाग एकशे आठावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे नववा

युधिष्ठीर विचारतो, आपण पहातो कीं, प्राणी विविध कारणाने त्रस्त झालेले असतात, त्यांतून ते कसे मुक्त होतील ते सांगा.

भिष्म सांगतात, संयमाने ब्राह्मण वर्णातील लोक जे करतात ते सांगतो ज्याची माहिती आपल्या संविधानी दिलेली आहे. ते केल्याने सगळ्या अडचणी दूर होतात. पहिली म्हणजे माणसाने वाह्यात इच्छा न ठेवणे, ज्यांची जगण्यासाठी वस्तुतः आवश्यकता नसते. त्याच प्रमाणे ते कधींच कोणाला धोका देत नाहीत. अशाप्रकारे मर्यादित ज्यानी त्यांच्या वासना ठेवल्या आहेत त्यांना सगळ्या अडचणींपासून मुक्तता मिळते. जे अपशब्दांचा उपयोग करून बोलणार्याशी प्रत्यूत्तर देत नाहीत ते मुक्त असतात. जे उपकार करतात परंतु, त्याच्या बदल्यात कांहीं अपेक्षा ठेवत नाहीत. जे कोणतेही व्यसन करत नाहीत, जे वेदाच्या अभ्यासात त्यांचा समय व्यतित करतात. असे लोक त्या त्रासातून मुक्त असतात. कारण ते सगळे त्रास त्यांच्या वाह्यात इच्छांतून उत्पन्न होत असतात. जे त्यांच्या जबाबदार्या समजतात व त्या पूर्ण करतात ते मुक्त असतात. ज्यांच्या वागण्यात चांगूलपणा, माणूसकी आणि भूतदया आहे, ते पाप करत नाहीत. राजांच्या बाबत बोलावयाचे म्हणजे असे, जे राजे त्याच्या प्रजेवर त्यांना पेलणार नाहीत असे कर लादत नाहीत, प्रजेचे संरक्षण करतात, त्यांच्या देशांचे संरक्षण करतात त्यांना कधी तसे त्रास होत नाहीत. जे प्रामाणिकपणे अग्नीहोत्र सांभाळतात, त्यांना कधी त्रास होत नाही. ज्यांच्यात हिम्मत आहे व जे युद्धात मागे हटत नाहीत, नेहमी विजय मिळवतात ते तशा त्रासात जात नाहीत. ज्यांच्या वागण्यामुळे ते सगळ्यांचे आदर्श ठरतात, जो राजा कधी आपल्या प्रजेला खोटे आश्वासन देत नाही. जो आपली संपत्ती योग्य कारणाने खर्च करतो, तो कधी त्रासात जात नाही. आता ब्राह्मणांबद्दल सांगतो, जे वेदाचा अभ्यास योग्य वेळी करतात, जे व्रतस्थ रहाणे पसंत करतात, त्यांना कधी त्रास होत नाही. जे ब्रह्मचर्य पालन करतात, तपस्या करतात, संयमाने रहातात त्यांना कधी त्रास होत नाही. ज्यानी सुखाच्या मर्यादा समजून त्याबद्दल अपेक्षा करण्याचे धोरण

अंगिकारले ते कधी अडचणीत येत नाहीत. जे सगळ्या चराचरात ब्रह्म पहातात व त्याचे स्वागत करतात, त्यांच्याशी क्रूरता करत नाहीत, त्यांच्या दुःखात व सुखात भागीदार होतात, त्याना कधी त्रास होत नाही. जे सर्वप्रकारच्या देवतांचा आदर करतात, जे दुसर्यांचे विचार समजून घेण्याचा प्रयत्न करतात, त्यांना कधी त्रास होत नाही. एकच सत्य अनेक प्रकारे मांडता येते हे लक्षात घेऊन ते ते विविध प्रकार आदरपूर्वकपणे ऐकतात, जे पितरांची श्राद्ध करतात, जे शुद्ध चित्ताने देवांची प्रार्थना करतात त्यांना कधी त्रास होत नाही. जे स्वताच्या व इतरांच्या वासनांवर अंकूश ठेवतात, ज्यांचा क्रोध संयमित आहे, ते तशा त्रासापासून मुक्त असतात. जे मितभाषी, मिताहारी व मितनिद्रा आहेत ते तशा त्रासात कधीच जात नाहीत. जे नारायणाची भक्ती मनापासून करतात ते तशा त्रासापासून मुक्त असतात. जो कृष्ण अर्थात नारायण जो तुमचा स्नेही आहे व अर्जुनाचा सखा आहे त्याला स्मरून तू कार्य करत राहीलास तर तुला कधी कोणताही त्रास होणार नाही.

ह्यांचे जो नित्य वाचन करील तो तशा त्रासापासून मुक्त असेल. मी तुला सांगितले माणसाने काय केले म्हणजे तो प्रापंचिक विवंचनांपासून मुक्त राहू शकतो.

शांती पर्व भाग एकशे नववा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे दहावा

युधिष्ठीर विचारतो, "आपल्या मध्ये असलेले कित्येक शांत वृत्तीचे असल्याचे दाखवतात परंतु, ते तसे नसतात. त्याच प्रमाणे कांहीं चंचल असल्याचे वाटते परंतु, ते तसे नसतात अशा वेळी मी त्यांचे वास्तव रुप कसे ओळखावे, त्याकरतां ते समजण्याची कांहीं निश्चित पद्धती असते कां"?

भिष्म सांगतात, ह्या संदर्भात एक रुपक कथा आहे कोल्हा आणि वाघाची ती सांगतो. प्राचीन काळी एका पुरीका नांवाच्या राज्यात एक राजा राज्य करत होता. ते राज्य संमृद्ध होते. राजा पुरीक फार दुष्ट होता. तो लोकांना त्रास देण्यात आनंद मानत होता. शेवटी त्याचा अंत येतो. वनात तो त्याच्या पापी कर्मामुळे एका कोल्ह्याच्या जन्माने पुन्हा येतो. त्याला त्याचा मागचा जन्म आठवत असतो त्यामुळे त्याला जो कोल्ह्याचा जन्म मिळाला त्याचे फार दुःख होते. तो खाण्याचे सोडून देतो. कोणी त्याला आणून दिले तरी तो ते मांस खात नव्हता. त्याला त्याच्या मागील जन्मातील कृत्यांचा पश्चात्ताप झाला होता. तो फक्त झाडाखाली पडलेली फळ खाऊन राहू लागला. तो एका मोठ्या स्मशानभूमीत राहू लागला. तो तेथून इतर ठिकाणी जाण्यास तयार नव्हता. त्याचे ते वागणे पाहून त्याचे इतर सवंगडी त्याला बोलतात, अरे तू मांस खाणार्या जमातीत जन्मला आहेस व ते खाणे सोडून तू फळें खात आहेस. इतर ठिकाणी जात नाहीस व अशा स्मशानभूमीत रहात आहेस, असा शुद्ध जीवन जगण्याचे कारण काय म्हणून ते त्याला विचारतात. तू आमच्यातला आहेस तेव्हां आम्ही देऊ ते तू खात जा. ते ऐकून तो कोल्हां त्यांना शांतपणे बोलतो, मला नीच कुळांत जन्म मिळाला आहे, परंतु, माझे वागणे उच्च आहे. त्या माझ्या चांगल्या वागण्याची ख्याती सगळीकडे पसरेल. एक लक्षात घ्या कीं, आपल्याला जो जन्म मिळतो तो आपल्याच गतजन्मातील कर्माचे फळ असतो. परंतु, त्या तशा जन्मात कसे रहावयाचे ते मात्र आताच्या जन्मात मी ठरवू शकतो. तुम्ही फक्त तुमचे पोट भरण्याचाच विचार करत अहात. जो शुद्ध जीवन जगत नाही त्याने कितीही दान धर्म केले, पुजा पाठ केले तरी त्याचा कांहींच उपयोग

नसतो. परंतु, जो शुद्ध जीवन जगतो परंतु, दान धर्म करत नाही तरी त्याला केवळ पुजा पाठ करून फायदा होत असतो. कारण शुद्ध जीवन हे महत्वाचे असते. मला तसे जगावयाचे नाही ज्यामुळे ह्या आणि नंतरच्या जीवनावर दुष्परिणाम होईल. अयोग्य इच्छा बाळगण्याची चूक मी आता करणार नाही जी मी माझ्या गेल्या जन्मात केली होती. म्हणून मी तुमच्या सारखे करणार नाही. ते त्यांचे संभाषण एक वाघ ऐकत होता. जो त्या वनातील प्राण्यांचा राजा होता. तो त्या कोल्ह्याला ज्ञानी समजतो व त्याची नक्कल करण्याचे ठरवतो. तो त्याला त्याचा सल्लागार नेमतो. वाघ त्याला बोलतो, अरे पुण्यवंता, आपण काय अहात मला माहीत आहे. आता तू माझ्या शासनाचा अधिकारी आहेस. तुला जे हवे ते घेऊ शकतोस. जे नको ते सोडून देऊ शकतोस. आम्ही भयंकर प्रवृत्तीचे असतो, हे तुला आधीच सांगत आहे. जर तू मवाळ असशिल तर तुझा फायदा होईल. ते ऐकल्यावर कोल्हा खाली मान घालून बोलतो, तुम्ही मला तुमचे मंत्री नेमून माझा गौरव केला आहे. तुम्हाला माझ्यासारखा पुण्यवंत मंत्री पाहिजे त्याचे मला सुद्धा कौतुक वाटते. तुम्हाला प्रामाणिक मंत्री आवडतात ते मला विशेष वाटते. माझे वर्तन तुमच्या इतर श्रीमंती मंत्र्यांच्या पेक्षा वेगळे असेल. मला संपत्ती नको, तुमचे पूर्वीचे मंत्री माझ्यात व आपल्यात भेद करण्याचा प्रयत्न करतील असे मला वाटते कारण माझ्या सच्च्या कामामुळे त्यांना त्रास होण्याची शक्यता आहे. मी स्वच्छ मनाचा आहे. मी पापी लोकांना उत्तेजन देत नाही. मला चांगली दूरदृष्टी आहे. परंतु, कांहीं मिळावे म्हणून मी कधी काम करत नाही. माझी कार्यक्षमता मोठी आहे. मी माझ्या मर्जीने वनात रहात असतो. राजाचे काम करणार्यांना लोकांकडून टिका ऐकावी लागते. परंतु, वनात रहाणारे त्यापासून मुक्त असतात. जंगलात रहाणार्यांना राजाच्या हुकूमांची भीती नसते. तेथे राजाचे चालत नाही. आम्ही वनात फळे व कंदमुळं खाऊन रहात असतो आम्हाला कोणाला कर द्यावा लागत नाही. चांगले खाणे व पाणी आम्हाला वनात सर्वत्र मिळते. असे पहाता वनात आनंद जास्त आहे व कसलीच चिंता नाही. राजा कांहीं चूक केली कीं सजा करणारच. कित्येकांना राजा खोट्या आरोपामुळे मारून टाकतो. असे सगळे असतांना तुम्ही मला तुमचा मंत्री नेमत अहात. त्याकरता मी आपल्याबरोबर एक समझौता करू इच्छितो. त्या प्रमाणे तुम्ही माझ्याशी वागाल असे झाले पाहिजे. मी

जे तुमच्या भल्यासाठी बोलेन ते आपण नीटपणे ऐकून घ्याल, त्याबद्दल आपण तुमच्या इतर मंत्र्यांचा सल्ला घेणार नाही. ते आपल्या व माझ्या कामात हस्तक्षेप करणार नाही. माझ्या वरील रागांमुळे ते माझ्या कामात अनेक दोष काढून तुमचे कान भरतील. आपण नेहमी गुप्त बैठका करू. तुमच्या आप्तांच्या बद्दलच्या कामात मी तुम्हासा काही सांगणार नाही. रागावून आपण माझ्या सेवकांना सजा करणार नाही. असें कोल्हा वाघाला बोलतो. त्यावर वाघराजा त्याला बोलतो, तसे होईल. त्यानंतर त्याला मंत्रीपदाची दिक्षा देतो. कोल्ह्याचे महत्व वाढू लागते. ते जुन्या मंत्र्याना आवडत नाही. ते कोल्ह्याविरुद्ध कट करतात. प्रथम ते कोल्ह्याशी दोस्ती करतात. त्याला दाखवतात कीं ते त्याच्यावर खूष आहेत. ते आतापर्यंत राजाची लूट करून मजेत रहात होते. परंतु, कोल्ह्याच्या कारभारात त्यांना तसे करणे अशक्य झाले होते. ते कोल्ह्याला त्यांच्या प्रमाणे करण्यास सांगू लागले पण कोल्हा त्यासाठी तयार नव्हता. तो वशिले लावत नव्हता. लांच खात नव्हता. कोल्हां फक्त राजाच्या भल्याचाच विचार करत होता. त्याचा काटा काढण्यासाठी ते प्रयत्न करू लागले. त्याला दिलेले स्वादीष्ट मांस ते चोरून नेऊन खराब मांस त्याच्या करता ठेवू लागले. त्याला ते सगळे समजत होते. ते सगळे तो सहन करत होता. त्याने राजा बरोबर जो करार केला होता त्या प्रमाणे राजा पुराव्या शिवाय त्याच्यावर दोष देणार नाही.

भिष्म पुढे सांगतात, एकदा वाघराजा जेवणासाठी आला तर तो पहातो कीं त्याचे मांस तयार नाही. त्याच्या मांसाची कोणी चोरी केली त्याची तो चौकशी करण्याचा आदेश काढतो व चोराला पकडण्याचे सांगतो. त्याचे मंत्री सांगतात कीं, तो नवा मंत्री कोल्हा ते खाऊन टाकत असतो. ते ऐकून वाघराजा संतापतो. तो कोल्ह्याला ठार मारण्याचा हुकूम करतो. त्या संधीचा फायदा घेत एक लुच्चा मंत्री राजाचे कान भरतो कीं, हा कोल्ह्या आमचे उपजिवीकेचे सगळे मार्ग नष्ट करत आहे. ते बोलतात जो राजाचे मांस खातो तो आमचे सुद्धा खाऊन टाकेल तरी त्यावर कांहीं इलाज केला पाहिजे. तो बोलण्यात मोठा हुशार आहे व स्वताला पुण्यवान सांगून तुम्हाला मूर्ख करत आहे. स्वता मोठा वैरागी असल्याचा देखावा करून आपल्याला फसवत आहे. आम्ही त्याच्या चोरीचे पुरावे तुमच्यापुढे सादर करून देऊ. त्यानंतर ते लुच्चे मंत्री राजाला घेऊन कोल्ह्याच्या

घरात जातात व चोरलेले मांस दाखवतात. राजा कोल्ह्याला ठार मारण्याची शिक्षा ठोठावतो. राजाची आई ते ऐकून राजाला सावध करते कीं, तो पुन्हा चांगला विचार करून मगच कोल्ह्याला मारण्याची शिक्षा करील. ती त्याला सांगते कीं, तो त्या मंत्र्यांच्या बोलण्यावर ताबडतोब विश्वास ठेवत आहे ते बरोबर नाही. ते त्याच्यावर खोटा आरोप करण्यासाठी कांहीं कुभांड रचत आहेत. मोठ्या साधूंवरसुद्धा असे आरोप पूर्वी झाले आहेत. लोभी लोक इमानदारावर खोटे आरोप करतात, आळशीसुद्धा प्रामाणिक सेवकांवर आरोप करतात, अडाणी लोक ज्ञानींवर आरोप करत असतात. कुरूप सुंदरांवर आरोप करतात, असे लोभी, आळशी, कुरूप निरपराध्यावर आरोप करत असतात. असे बृहस्पति सांगत असतात. आता पहा कोल्हा मांस खात नाही हे तुला माहीत आहे. चोर साव असल्याचे सोंग घेऊन वावरत असतो. तसेंच सज्जन लोक कधी चोर असल्यासारखे वाटते. म्हणून चांगली तपासणी केल्याशिवाय तू त्याला मारणार नाहीस. काजवा आगीच्या ठिणगी सारखा दिसतो, आकाश एकाद्या उपड्या केलेल्या घमेल्यासारखे दिसते पण ते तसे नसतात. म्हणून चांगली चौकशी केल्याशिवाय तू त्याला हात लावणार नाहीस. तसे नीट न तपासता तू कांहीं केलेस तर तुझ्यावर पश्चात्ताप करण्याची पाळी येईल. राजाला त्याच्या सेवकाला ठार मारणे सोपे असते. परंतु, त्याने राजाचे नांव खराब होण्याची शक्यता असते. त्याच्या इमानदारीमुळे त्याचे नांव चौफेर प्रसिद्ध झाले आहे. त्याला सगळे मानत आहेत. म्हणून तू त्याची बाजू घेऊन चौकशी केली पाहिजेस. असा चांगला मंत्री शोधूनसुद्धा सापडणार नाही. कोल्हां तुझा हितचिंतक आहे, त्यांना तुझ्या राज्यात मोठ्या सुधारणा केल्या आहेत. त्यांचा विसर पडू देऊ नको. अशा मंत्र्याला मारून तू मोठ्या संकटात सापडशिल असे मला वाटते. त्यामुळें तुझ्या हलकट मंत्र्याचे फावणार आहे. राजमातेच्या ह्या सल्ल्याने वाघ सावध होतो व तो कोल्ह्याला चोर शोधण्याचे काम सांगतो. कोल्हा लवकरच सगळे शोधून काढतो. राजा कोल्ह्याला मिठी मारतो. त्यानंतर कोल्हा राजाला नमस्कार करतो व त्याची नोकरी सोडून जाण्याचे सांगतो. तो सांगतो कीं, त्याला आता समाधी घ्यावयाची आहे. वाघ त्याचे मन वळवण्यासाठी खूप प्रयत्न करतो. कोल्हा त्याला बोलतो, आपण माझा प्रथम मोठा सन्मान केला त्यानंतर त्या खोट्या मंत्र्यांच्या

सांगण्यावरून अपमानसुद्धा केला आहे. त्यांच्या कारस्थानाला आपण बळी पडलात. अशा परिस्थितीत मी ह्यापुढे आपल्याबरोबर काम करू शकणार नाही. जेथे मालकाचा विश्वास उरला नाही तेथे नोकराने राहू नये. एकदा मला तुम्ही प्रामाणिक म्हणून निवडले व आता त्या मंत्र्यांच्या खोट्या बोलण्यात येऊन मला चोर ठरवले, जर तुमची माता तुम्हास सावध न करती तर मी मारला गेलो होतो. अशा चंचल मनाच्या मालकाबरोबर रहाणे धोक्याचे आहे. मी तुमच्या बरोबर सुरक्षित नाही. तुम्ही माझ्याबद्दल शंका घेऊन अशी परिस्थिती निर्माण केली कीं मी आता तुमच्यावर विश्वास ठेवू शकत नाही. असे पुन्हा होणार नाही असे मी कसे समजू? संशयाचे बीज तुमच्या मनात त्या मंत्र्यानी माझ्या विरूद्ध पेरले आहे ते पुन्हा पुन्हा रुजणार नाही ह्याची कांहीं शाश्वती नाही. आपल्यात तो पहिला जिव्हाळा रहाणार नाही. सगळे प्राणी स्वार्थाने प्रेरित होऊन सगळे संबंध तयार करतात व वाढवतात. निस्वार्थी असे फार थोडे असते. ज्या राजाचे मन चंचल आहे तो कधी भरवशाचा रहात नाही. केव्हां काय होईल ते सांगता येत नाही. अज्ञान व गैरसमज सगळ्या संशयाला कारणीभूत असतात.

भिष्म पुढे सांगतात, कोल्हा असे समजावत पुण्य, हित आणि सुखाच्या शोधात त्याच्या वनात निघून जातो. त्यानंतर तो कोल्हा त्याचे शरीर सोडून स्वर्गाकडे जातो.

शांती पर्व भाग एकशे दहावा संपला.

# शांती पर्व
## भाग एकशे अकरावा

युधिष्ठीर विचारतो, राजा स्वता सुखी होण्यासाठी काय करू शकतो? त्याबद्दल मला सगळे सांगा.

भिष्म सांगतात, ऐक मी तुला त्या बद्दल सगळे सांगतो, सुखी होण्यासाठी राजा ते कांहीं करणार नाही जे त्या उंटाने केले, त्याची माहिती तुला आता सांगतो. कृतयुगात एक प्रचंड आकाराचा उंट होता त्याला त्याच्या सगळ्या गत जन्मांची आठवण होती. तो मोठा व्रतस्थ होता व तीव्र अशा उपासना तो त्याच्या जंगलात करत होता. जसे त्याचे तप पूर्ण होत आले ब्रह्मदेव त्याच्यावर प्रसन्न झाले. पितामह त्याला वर देणार होते, तो मागतो कीं त्याची मान ब्रह्मदेवाच्या कृपेने लांबडी व्हावी. म्हणजे तो अनेक योजने दूर असलेला पाला खाऊ शकेल. ब्रह्म त्याची मागणी मान्य करतात. त्याची मान चांगली लांबलचक झाल्यामुळे बसल्या जागी तो त्याला हवा तो पाला खाऊ लागला. तो त्यामुळे आळशी बनला. त्याचे फिरणे हालचाल करणे बंद झाले कारण त्याची गरजच उरली नव्हती. त्यावेळी एक वादळ सुरू झाले उंटाने एका पहाडातील गुहेत लपण्याचे ठरवले. वादळ थांबण्याची तो वाट पहात होता. त्या वदळाचे प्रलयात रुपांतर होत होते, सगळी पृथ्वी पाण्याखाली जात आहे कीं काय असे झाले. त्यावेळी एक कोल्हा व त्याची पत्नी त्या वादळापासून संरक्षण मिळावे म्हणून त्याच गुहेत आले. त्याला खाण्यासाठी मांस पाहिजे तेथे त्याला उंटाची मान दिसली तो ती खाऊ लागला. उंटाला समजले कीं कोणीतरी त्याची मान खात आहे. थोड्याच काळात तो उंट मेला. तेवढ्यात वादळ शमले व कोल्हा त्याच्या बायको बरोबर गुहेतून बाहेर आला. अशारितीने तो मूर्ख उंट त्याच्या प्राणाला मुकला होता. आळसामुळे तो मेला असे तात्पर्य ह्या कथेचे आहे. आळस माणसाचा नाश करत असतो. आळसात वेळ न घालवता कांहीं योग्य काम करत रहाणे माणसाला जरुरीचे असते. मनू सांगतात, जय बुद्धीने मिळतो. ज्या गोष्टी बुद्धीने केल्या जातात त्या श्रेष्ठ समजल्या जातात, ज्या हाताने केल्या जातात त्या मध्यम समजल्या जातात, पायाने केलेल्या खालच्या दर्जाच्या समजल्या जातात. जर राजा

चतूर असेल तर त्याचे राज्य सुरक्षित असते. मनू सांगतो की, महत्वाकांक्षी माणसाला बुद्धी असावी लागते. अरे युधिष्ठीरा, चांगल्या हितचिंतकांचा सल्ला घेऊन राजा त्याचे राज्य चालवत असतो. ज्या राजाने निरखून चांगले सल्लागार मिळवले तो जगावर राज्य करतो. असे आपल्या संहितेत दिले आहे. मी तुला तेंच सांगत आहे. म्हणून तू तुझ्या चांगल्या सल्लागारांच्या विचाराने व स्वताची बुद्धि शाबूत ठेवून तुझे राज्य केले पाहिजेस. ब्रह्माची सेवा करण्यासाठी चांगला राजा त्याचे राज्य वाढवत असतो, केवळ हव्यासा पोटी जो राजा राज्य वाढवतो त्याला देवतांचे आशिर्वाद मिळत नाहीत.

शांती पर्व भाग एकशे अकरावा संपला.

# शांती पर्व
## भाग एकशे बारावा

युधिष्ठीर विचारतो, "मला सांगा, राजाने मोठे प्रदेश जिंकल्यानंतर त्याचे राज्य प्रस्थापित करतांना बलाढ्य शत्रूशी कसा मुकाबला करेल"?

भिष्म सांगतात, ह्या संदर्भात एक किस्सा आठवतो तो सांगतो, तो समुद्र आणि नदींच्या संभाषणाचा आहे. फार प्राचीन काळी समुद्र जो सगळ्या नद्यांचा मालक असतो तो नद्यांना बोलतो, "अहो नद्यानो, तुम्ही तुमच्या प्रवाहाने माझ्यामध्ये मोठे वृक्ष त्यांच्या मुळांसकट आणून टाकत असता, परंतु, तुम्ही कधी ते वेल आणत नाही जे तुमच्या काठावर वाढत असतात. ते नाजूक व लवचिक असून तुमच्या प्रवाहात कां येत नाहीत"? कां, त्याना तुम्ही मुद्दामच उपटून काढत नाही. मला त्याचे कारण सांगा. नद्यांच्या वतीने गंगा सांगते, "अहो धनी, मोठी झाडे आमच्या वाटेत कणखरपणे उभी रहातात त्यामुळें त्यांना आम्ही त्यांचा गर्व काढण्यासाठी उपटून काढतो. वेलांना तसा गर्व नसतो, ते आमच्या प्रवाहाप्रमाणे लवून पुन्हा उभे रहातात. त्यांना गर्व नसतो म्हणून ते उपटले जात नाहीत. ज्यांना गर्व नाही ते टिकतात व जे गर्वाने ताठ उभे रहातात त्यांचा गर्व मोडला जातो. ज्या राजाला कोठे वाकावयाचे व कोठे ताठ उभे रहावयाचे ते समजते तो राजा प्रगती करत असतो. स्वताची ताकद, क्षमता ह्यांची योग्य पारख असलेला राजा कधीच मोडला जात नाही. जो राजा त्याच्या ताकदीपेक्षा मोठ्या शत्रूला आव्हान देतो तो मोडला जातो. राजा कधी कोठलाही प्रतिष्ठेचा प्रश्न न करता त्याचे शत्रूशी वागेल. परकिय धोरणात लवचिकपणा मोठा उपयोगाचा असतो, त्याला कमजोरी समजू नकोस प्रत्येक वेळी लढण्याची गरज नसते आपले सामर्थ्य दाखवण्यासाठी. युक्तीनेसुद्धा बाजी मारता येते. त्याला यशस्वी माघार असे म्हणतात. कारण योग्य वेळी यशस्वी पुढाकार तो करू शकतो.

शांती पर्व भाग एकशे बारावा संपला.

# शांती पर्व
## भाग एकशे तेरावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "बुद्धीमान माणसाने त्याचा अपमान करून त्याच्याशी बोलणार्याशी कसे वागावे"?

भिष्म सांगतात, ऐक धर्माच्या मुला, अपमान करण्याच्या मागे उद्देश असतो तुझ्यातील क्रोध जागा करावयाचा. परंतु, जर तुझ्यात तसा क्रोध जागा झाला नाही तुझा अपमान केल्यानंतरसुद्धा तर तो उद्देश विफल झाला असे होते. अपमान करणार्याचा तो पहिला पराजय असतो. त्याची शक्ती त्यामुळे नष्ट होत असते. अपमान करण्याचे अनेक उद्देश असतात. त्यातील हा एक आहे. दुसरा असतो स्वताचे श्रेष्ठत्व दाखवणे. अशावेळी त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून त्याच्या प्रश्नांना उत्तरं न देता आपले काम करत रहाणे हेंच योग्य समजले जाते. जसे, कुत्रा भूंकतो हत्ती चालतो, असे वागावे. तो जरी अपमान करून बोलत असला तरी जर त्याला उत्तर देणे क्रमप्राप्त असेल तर आपण मात्र शांतपणे चांगली भाषा वापरून बोलावयाचे असते. तो शिष्टाचार सर्वमान्य आहे. आजूबाजूला असलेले सगळे समजून घेत असतात. अपमान करणारा भांडण उकरून काढणारा असतो त्याला तसेंच उत्तर देण्यांने तो त्याच्या उद्देशात कामयाब झाला असे होते. परंतु, जर तू त्याच्या बोलण्याला शांतपणे मुद्देसूदपणे उत्तरं देत असशिल तर त्याची भांडण करण्याची क्षमता नष्ट होत असते. त्यातच तुझा जय असतो. त्याला उत्तर न देता गप्प राहीले तरी तो त्याच्या उद्देशात कामयाब झाला असें होत असते. राजा कधी कोणाशी भांडणार नाही. तो नेहमी मुद्देसूदपणे बोलेल. नेहमी कमी बुद्धी असलेले भांडणं उकरून काढतात असें समजले जाते. कारण त्यांच्या कडे योग्य मुद्दा नसतो. खोटे मुद्दे मांडणारे स्वताला नागवे करत असतात. खोटे बोलणारे कधी नजरेला नजर लावून बोलत नाहीत. त्यावरून त्यांचा खोटेपणा सिद्ध होतो परंतु, हा नियम बायकांना लागत नाही. कारण बायका कधी नजरेला नजर लावून बोलत नाहीत. खोटे बोलणार्याला पाप लागत असते त्याची अध्यात्मिक उर्जा कमी होत असते जर त्या खोटे बोलण्यात वाईट उद्देश असेल. त्यासाठी शहाणी माणसे अशा लोकांपासून दूर

रहाणे उचित समजतात. दुसर्याबद्दल कान भरणारे स्वतः खोटे असतात हे लक्षात घेतले पाहिजे. पाठी टीका करणारे बहुधा खोटे असतात. असे खोटे बोलणार्याच्या तोंडाला लागणारे स्वतः मुर्ख ठरतात. जगात आपली नेहमी चर्चा होत असते, त्यातून ते सूज्ञ जग तुम्हाला ओळखत असते हे लक्षात ठेवणारा कधी खोट्या प्रचारामुळे घाबरत नाही. खोटे बोलणारे यथावकाश त्याच्या खोटेपणाने संपतात. बहुधा खोट्या बोलण्यामुळे व आरोपामुळें मारामार्या होत असतात व त्यानंतर बळी तो कान पिळी असे ठरते. हलक्या कानाचे लोक अशा गोष्टीत जास्त गुंततात. त्यांना त्यात करमणूक मिळते. राजाला अशा खोट्या प्रचारांना बर्याच वेळा तोंड द्यावे लागते. त्यासाठी त्याला व त्याच्या मंत्र्यांना नेहमी स्वच्छ रहावयाचे असते.

शांती पर्व भाग एकशे तेरावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे चौदावा

युधिष्ठीर विचारतो, अहो पितामहा, आपण चांगले जाणकार अहात सगळ्या व्यवहाराचे म्हणून मला सांगा आणि माझे समाधान करा, आपण आपल्या कुळाचे मुख्य अहात, आपण वाईट अपमानकारक भाषा कशी असते ते सांगितले आहे, माझा प्रश्न असा आहे कीं, राजा ज्याची नेमणूक झाली आहे सिंहासनावर ज्याच्या भोवती त्याचे मित्र, हितचिंतक, मंत्री, सेवक आहेत व त्यांना तो समाधान देत आहे, त्याने काय काय चांगले करावे ज्यांमुळे त्याचे, त्याच्या कुळांचे, त्याच्या राज्याचे भले होत राहील.

त्याच प्रमाणे, तो राजा त्याच्या मोह व लोभामुळें त्याच्या कर्तव्यापासून दूर गेला आहे, चुकीच्या संगतीत गेला आहे, ज्याचे मती गुंग झाली आहे, त्याला कसे सुधारावयाचे ते सांगा व माझे शंका समाधान करा. आपण आम्हाला क्षात्रविद्या शिकवत अहात. ज्यात क्षत्री (विदूर) सुद्धा जाणकार आहेत. ते सुद्धा आम्हाला नेहमी चांगले मार्गदर्शन करत असतात. तुमच्या कडून असे मार्गदर्शन मिळाल्यामुळे माझे उर्वरित आयुष्य शांती व समाधानात जाईल असे मी समजतो.

मला सांगा हलका सेवक व उच्चगुणी सेवक कसे ओळखावे. त्याचे निकस कोणते ते सांगा. त्यात त्याच्या कुळाचा विचार करणे योग्य असते कां? राजाला सेवकांची मोठी गरज असते कारण तो एकटा राज्य चालवू शकणार नाही. उच्च कुलीन परंतु, लोभी असतील तर ते चालणार नाहीत हे उघड आहे.

भिष्म सांगतात, राजा कधीच एकटा राज्य करत नसतो. त्याला राज्य चालवण्यासाठी मोठा सेवक संघ आवश्यक असतो. त्याचे सेवक त्यांच्या ठरलेल्या कामाबाबत चांगले जाणकार असणे हा पहिला निकस आहे. त्यांचा राजाशी असलेला प्रामाणिकपणा हा दुसरा निकस आहे. बर्याच वेळा उच्च कुळी जन्म असणे एक चांगला तिसरा निकस ठरू शकतो परंतु, त्याचे विशेष महत्व नसते, कारण माणसाचे कुळ माणूस मोठे करत असतो. जेव्हां आपण म्हणतो उच्च कुळ म्हणजे केव्हातरी त्या कुळांत गुणी माणसे होऊन गेली आहेत. परंतु, तसे नसले म्हणून कांही बिघडत नाही. पहिले दोन निकस

महत्वाचे आहेत. चौथा निकस आहे त्यांच्या बुद्धीमत्तेचा अथवा चतुराईचा (*बुद्धि आणि चतुराई ह्यात फरक असा कीं, बुद्धिने मनुष्य दुरागामी परिणामांचा अंदाज घेऊन निर्णय घेतो व चतुराईमध्ये ताबडतोबच्या फायद्याचाच फक्त विचार केला जातो, बर्याच वेळा चतुर निर्णय दुरागामी नुकसानकारक असू शकतात*), कांहीं कामासाठी सेवक बुद्धीमान नसला तरी जर चतूर असेल तर ते विशेष उपयोगाचे असते जसे, हेरगिरीमध्ये चतुराई जास्त महत्वाची असते. कांहीं प्रकारच्या कामासाठी विशिष्ठ शिक्षण आवश्यक असते तशा नोकरीसाठी ते शिक्षण असलेला असणे हा पांचवा निकस महत्वाचा असतो. राजाचे सेवक त्याच्या राज्याचे असणे हा एक सहावा निकस असतो कारण तसा सेवक त्या राज्याशी व राजाशी इमानदार असतो. परकीय देशातील मनुष्य कदाचित तितका विश्वसनीय नसण्याची शक्यता असते. त्याची कार्यक्षमता हा एक महत्वाचा सातवा निकस असतो.

आळशी, बेजबाबदार, सबबी देणारा, भ्रष्ट (लाचलुचपत करणारा), सत्तेचा (अधिकाराचा) गैर वापर करणारा, खोटे बोलणारा, दुष्ट, संशयी, कामचुकार असे दोष असलेले नसावेत.

न्यायाधीश सांख्य आणि लिखीत परंपरेतील कायदे जाणणारा असला पाहिजे.

राजा त्यांचे वेतन योग्य देईल, त्यांना योग्य वेळी तो मिळेल, त्यांच्या इतर आवश्यक गरजांकडे (आजारपणं, रजा, बक्षिसं, बढत्या इत्यादी) राजा जातीने लक्ष देईल. सेवक सेवेत असतांना मृत्यू पावला तर त्याच्या कुटूंबियांची काळजी राजा पाहिल. त्यांच्या ज्येष्ठतेचे नियम राजा कोणावर अन्याय होणार नाही अशा प्रकारे अमलात आणेल. असे सगळे व्यवस्थित असेल तर तो राजा त्याच्या सेवकांकडून उत्तम काम करून घेऊ शकतो.

शांती पर्व भाग एकशे चौदावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे पंधरावा

भिष्म पुढे सांगतात, ह्या संदर्भात मी कांहीं जुन्या गोष्टी सांगतो. त्यांमधून चांगले लोक व शहाणे लोक ह्याची माहिती तुझ्या लक्षात येईल. ज्यांचा तुझ्या हल्लीच्या परिस्थितीशी साम्य आहे. मला त्या जमदग्नीच्या मुलाच्या आश्रमात कांहीं ऋषींकडून समजल्या. ती अशी, एका मोठ्या अरण्यात एक बैरागी रहात होता. तो मोठी तपस्या करत होता. त्याचे विचार शुद्ध होते, वेदातील कवनांचे तो सतत स्मरण करत असें. त्याने तीन धोरणांचे (माणूसकी, चांगुलपणा व भूतदया) पालन केले होते त्यामुळे तो निष्पाप होता. त्याची सारासार बुद्धीमत्ता शाबूत होती. वनातील प्राणी त्याच्याशी प्रेमांने वागत असतं. हिंस्र प्राणी जसे सिंह, वाघ, रानटी हत्ती, गेंडे, अस्वलं ते सगळे त्या ऋषीकडे जाऊन त्यांचे नितीमत्ते बद्दलचे प्रश्न त्याला विचारून त्याचे समाधान मिळवत होते. ते त्याचे शिष्य असावेत असे त्यांचे वागणे होते. ते येत व जात परंतु, एक पाळीव प्राणी मात्र त्याच्याकडे कायम रहात होता. तो त्या ऋषीच्या सानिध्यात सदैव असे व त्याची भक्ती करत असे. तो पूर्णतया निरुपद्रवी होता. एके दिवशी एक चित्ता तेथे येतो ज्याचा आहार मांस व रक्त होता. तो यमासारखा दिसत होता. तो चित्ता भुकेला होता. तो त्या पाळीव कुत्र्याला खाण्याचा विचार करत होता. ते पाहून कुत्रा ऋषीला बोलतो, हा चित्ता आम्हा कुत्र्यांचा शत्रू आहे. तो मला खाण्याचा विचार करत आहे. माझी भिती नष्ट होईल असे कांहींतरी करा. ते ऐकल्यावर ऋषी समजतो कीं, त्याच्या कुत्र्याची भिती योग्य आहे. तेव्हां तो ऋषी त्याला बोलतो, तुला ह्यापुढे चित्त्याची भिती रहाणार नाही. असे त्याचे बोलणे होते व त्या कुत्र्याचे एका चित्त्यात रुपांतर होते. त्याचे दांत फार मोठे होते. तो सुद्धा इतर चित्त्यांप्रमाणे वनात जाऊन राहू लागतो. ते पाहून त्या पहिल्या चित्त्याच्या मनातील त्याला खाण्याचे विचार संपतात. त्यानंतर एकदा एक भुकेला वाघ त्याच्या आश्रमात येतो. तो त्या चित्ता झालेल्या कुत्र्याच्या कडे भुकेने पहात असतो जणूकाय तो त्याला खाणार. ते पाहून तो चित्ता झालेला कुत्रा ऋषीला विनंती करतो कीं, त्याला त्या वाघापासून संरक्षण द्यावे. असे

सांगतातच तो आता वाघ बनतो. ते पाहून तो भिकेला वाघ त्याचा विचार सोडून देतो. त्यानंतर तो वाघ झालेला शांत कुत्रा त्या वनातील प्राणी खाऊन राहू लागतो.

शांती पर्व भाग एकशे पंधरावा संपला.

[*असे सांगतात की, कृत युगात सर्व प्राणीमात्र मोक्षसाधना करू शकत होते. त्यानंतर पुण्य प्रभाव कमी झाल्यामुळे त्रेतायुगात फक्त मनुष्य, वानर आणि सुग्रीव (अस्वलाच्या सारखे) मोक्ष प्राप्त करू शकत होते. आणखीन पुण्यप्रभाव कमी झाल्यानंतर वानर आणि सुग्रीव प्रजाती नामशेष झाल्या आणि द्वापार युगात फक्त मनुष्य मोक्ष साधना करू शकत होते. पुढे पुण्य प्रभाव आणखीन कमी झाल्यानंतर कलीयुगात फक्त सात्त्विक प्रवृत्ती असलेले मनुष्य मोक्ष साधना करण्याच्या योग्यतेचे राहिले आहेत. विश्वातील एकंदर पुण्यप्रभावाच्या प्रमाणानुसार हे होत असते.*]

# शांती पर्व
## भाग एकशे सोळावा

भिष्म सांगत असतात, वाघ झालेला कुत्रा आता वनात जाऊन प्राणी मारून खाऊ लागला. एकदा एक चिडलेला रानटी हत्ती आश्रमाकडे येतो व त्या वाघावर चाल करतो, ते पाहून तो वाघ झालेला कुत्रा पुन्हा ऋषीकडे संरक्षण मागतो व ऋषी त्याचे एका प्रचंड हत्तीत रुपांतर करतात. त्याचा झालेला हत्ती पाहून तो रानटी हत्ती तेथून पळून जातो. आता कुत्रा हत्ती झाला होता तो मजेत पालापाचोळा खात व तलावात डूबक्या मारत आपला समय घालवू लागतो. तसे चालले होते तशात एकदा एक भुकेला सिंह तेथे येतो त्याची नजर त्या भल्यामोठ्या हत्तीवर पडते. हत्ती झालेला कुत्रा ऋषीला सांगतो व ऋषी आता त्याचे एका भयंकर सिंहात रुपांतर करतात. ते पाहून तो आलेला सिंह घाबरून निघून जातो. आता सिंह वनात मजेत लहान प्राण्यांना खाऊन रहात असतो. असे चालले होते त्या सुमारास एक सरभ तेथे येतो ज्याचे खाद्य असते सिंह. त्याला पाहिल्यावर तो कुत्रा पुन्हा ऋषींना मदत करण्यास सांगतो व ऋषी त्याचे एका सरभात रुपांतर करतात. त्यानंतर तो सरभ सगळ्या प्राण्याची शिकार करत अरण्यात भटकत असतांना एकदा आश्रमात येतो व ऋषीलाच खाण्याचा प्रयत्न करणार असतो. ते पाहून तो ऋषी त्या सरभाचे पुन्हा त्याच्या मूळ रुपात म्हणजे कुत्र्यात रुपांतर करतात. तो ऋषी त्या कुत्र्याला बोलतो "अरे कुत्र्या, मी तुला प्रेमांने वाचवण्यासाठी विविध रुपात नेले पण आता ह्या सरभ रुपात तू मलाच खाण्यास निघाला आहेस. ज्या कुळात तुला नेले त्या कुळाचा धर्म तू मला दाखवत आला आहेस व आता सरभाच्या रुपात तू मलाच खाण्यास निघाला आहेस".

प्राणी त्यांचे मूळ स्वभाव सोडत नसतात असे ह्या कथेने दाखवले आहे.

शांती पर्व भाग एकशे सोळावा संपला.

*सरभ हा आठ पायाचा हिंस्र प्राणी आता नामशेष आहे. महाभारतात त्याचा उल्लेख ठिकठिकाणी झाला आहे.*

# शांती पर्व

## भाग एकशे सतरावा

भिष्म पुढे सांगतात, तो कुत्रा पुन्हा त्याच्या मूळ रुपात आल्यावर त्याच्यातील आत्मा त्याने घेतलेले विविध अनुभव विसरावयाला तयार नव्हता. तो दुःखी झाला. त्याचे ते वागणे पाहून ऋषी त्याला त्यांच्या आश्रमातून हाकलून देतात. त्यासाठी राजानेसुद्धा त्याच्या सेवकांचे फाजिल लाड करावयाचे नसतात. आपल्या नोकरांची तो वेळोवेळी चाचपणी करत असेल कारण काल प्रामाणिक असलेले नोकर परिस्थितीमुळें आज अप्रामाणिक होण्याची शक्यता असते, कोणतीही गोष्ट नित्य नसते ह्या नियमानुसार राजा सदैव सतर्क असले. असे सांगतात कीं, राजाच्या नोकरात राजाचे गुण असावेत अशी अपेक्षा लोक करत असतात त्या प्रमाणे त्याचे नोकर त्याचे खरे प्रतिनिधी होतात कां, ते त्याने तपासावयाचे असते. त्या करता आधी जे निकस सांगितले त्या प्रमाणे सगळे आहे कीं, नाही ते राजाच्या अधिकार्यांने पहावयाचे असते. असे समजले जाते कीं, हलक्या जन्माचा नोकर त्याला रागावले तर सूड बुद्धीने वागत असतो. परंतु, उच्च कुलीन नोकर त्याला का राजा रागावला त्याचा विचार करून आपली सुधारणा करण्यावर भर देत असतो. म्हणून राजाने त्याचे नोकर कोठल्या कुळातील आहेत ते पहाणे जरुरीचे असते. जी समज उच्च कुलीन मनुष्य दाखवतो ती हलक्या कुळाचा दाखवू शकत नाही. म्हणून राजाचे मंत्री उच्च कुलीन असले पाहिजेत. ज्यांच्या वागण्यात व बोलण्यात मर्यादा असते. अर्ध्या हळकुंडात पिवळा होणारा असे ज्यांचे वागणे असते ते शत्रूच्या डावात फसू शकतात म्हणून तशांच्या नेमणूका करतांना राजा सावध असेल. कारण राजाला सगळे उत्तम गुणी सेवक मिळणे शक्य नसते अशावेळी जे मिळतील ते कामाला घ्यावा लागतात. कोणाच्या मनात काय आहे ते समजणे सोपे नसते. महत्वाच्या नेमणूका करतांना राजा विशेष सावध असेल. राजाच्या सेवकांबद्दल प्रजा काय बोलते तेसुद्धा राजाने समजून घ्यावयाचे असते. स्वभावतः मत्सरी, द्वेषी, क्रूर, असभ्य अशी माणसे राजा त्याच्या सेवकांत घेणार नाही. ज्या प्रांतात नेमणूक करावयाची त्या प्रांताची चांगली माहिती असलेला व त्या प्रांताच्या लोकांबद्दल द्वेषाची

भावना नसलेले असे कर्मचारी राजा तेथे लावेल. राजा त्याच्या नोकराचे पाप पुण्य भाव त्याला समजणार नाही अशा प्रकारे समजून घेईल. कारण त्यांच्या पापाचा राजा भागीदार असतो. कमी पाप करणारा सेवक राजाने कामाला लावावयाचे असतात. राजाच्या नोकरात प्रजा राजा पहात असतात म्हणून गैर वर्तन करणारे राजा त्याच्या सेवेत घेणार नाही. नोकरीला लावतांना राजा फार दक्षता बाळगेल. जो राजा अशी दक्षता बाळगतो त्याचे राज्य मजबूत होते. आपल्या राज्यातील जनतेत माणूसकी, चांगुलपणा व भूतदया ही तीन वागण्याची धोरणं लोकांत जो राजा रुजवतो तो मोठा राजा होतो कारण त्याच्या राज्याचे पुण्य सामर्थ्य सतत वृद्धींगत होत असते. अशा राज्यावर अस्मानी संकटं सहसा येत नाहीत. त्या राज्यात गुणी लोक जन्म घेतात. त्यामुळे त्या राज्याचा दर्जा उंचावतो. ते एक श्रीमंत राज्य होते. त्या उलट ज्या राज्यात ह्या तीन गुणांची शिकवण दिली जात नाही त्यात पाप वाढत जाते. अनेक प्रकारच्या अस्मानी संकटांना त्या राज्याला सामोरी जावे लागते. शत्रू असा आपला शत्रू का झाला त्याचा विचार राजाचे मंत्री करतील. ते करतांना भावनिक दृष्टीकोन त्यात नसावा. चांगले काम केल्याबद्दल राजा त्याच्या सेवकांचे कौतुक करील न विसरता. छोट्या छोट्या गोष्टी असतात अशा, पण त्यांचे परिणाम मोठे असतात त्या सेवकांच्या मनोरचनेत, हे राजाने ध्यानात घेतले पाहिजे. हलक्या कुळांतील सेवक भ्रष्टाचारात लवकर रमतो. लाचलुचपत वाढत जाते, तो त्याच्या अधिकाराचा गैरवापर करू लागतो म्हणून महत्वाच्या जागांवर तसे लोक राजा नेमणार नाही. राजा आळसात त्याचा समय घालवणार नाही. राजा कितीही चांगला वागत असला तरी त्याच्या वागण्यात अशी जरब असावी कीं, त्याचे सेवक त्याला घाबरत असतील. राजा कोणाची टिका ऐकल्यावर ताबडतोब त्याबद्दल आपले मत बनवणार नाही. प्रत्येक गोष्टीची शहानिशा तो करील. कारण घाईने कांहीं केले तर त्यामुळे कोणावर अन्याय होण्याची शक्यता असते. राजा युद्ध कलेच्या स्पर्धा आयोजित करून त्याच्या प्रजेत त्या कले बद्दल जागृती उत्पन्न करणाया प्रयास करत असेल. कारण उत्तम योद्धे ही राज्याची मोठा गरज असते. अशा योद्ध्यांचा तो सन्मान करेल. राजा स्वतः एक उत्तम योद्धा असला पाहिजे. युद्धाच्या अनेक कला आहेत त्या सगळ्यांचा सराव त्याचे सैनिक करतील ह्यासाठी राजा व्यवस्था

करेल. राजाचे शस्त्रागार अद्ययावत असले पाहिजे. राजा कमीत कमी वेळ बायकांत काढेल.

शांती पर्व भाग एकशे सतरावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे अठरावा

भिष्म सांगतात, कुत्र्याच्या गोष्टीचे तात्पर्य असे कीं, राजा नेमणूका करतांना कर्मचार्याची योग्यता पाहून त्याप्रमाणे करेल. अयोग्य कर्मचारी लावला तर कामात खराबी होणार हे त्याने समजून घेतले पाहिजे. कांहीं लोक त्याना मिळालेल्या सत्तेचा दुरूपयोग करणारे असतात अशांना सत्ता देतांना राजा व त्याचे मंत्री सावध असतील. कारण अशामुळे प्रजेचे नुकसान होणार नाही हे त्याला पहावयाचे असते. जो ज्या लायकीचा तो त्या जागी असेल राज्याच्या कारभाराच्या यंत्रणेत. असे धोरण असावे. एक जरी चुकीची नेमणूक झाली तरी त्याचे दुष्परिणाम सगळ्या व्यवस्थेला होऊ शकतात. चूकीच्या नेमणूकांमुळे राज्यात भ्रष्टाचार वाढत असतो. राजा नेमणूका वशिल्याने करणार नाही. कारण अशा नेमणूकीचे सेवक चांगले काम कधीच करत नाहीत. जे सेवक त्यांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न करतात त्यांना राजा उत्तेजन देईल. बुद्धीमान, चतूर, प्रामाणिक, कार्यक्षम, वागण्यात सज्जन, शांतपणे विचार करू शकणारे, कोणत्याही प्रकारचा दोष नसलेले असे उच्च कुलीन लोक राजा मंत्री म्हणून घेईल. राजा निराशावादी लोक त्याच्या मंत्रीमंडळात घेणार नाही. राजा महसुल गोळा करणार्या सेवकांची खास व्यवस्था करेल कारण त्यांच्या कामामुळें राज्यास संपत्ती मिळत असते. राज्याचा खजिना समृद्ध होण्यासाठी राजा प्रजेवर तिला मानवेल असे कर आकारेल. त्याशिवाय परदेशात वैश्य पाठवून व त्याना भांडवल पुरवठा करून तो राज्यातील मालासाठी परदेशात मागणी वाढवून त्याद्वारा निर्यातीचे धोरण राबवेल आणि उत्पन्न वाढवेल. प्रजेवर कर असे लावेल कीं त्याच्यातील त्यांच्या राज्या बद्दलची जबाबदारीची जाणीव उत्पन्न होईल. राजा कृषी उत्पन्नावर भर देईल. त्यासाठी पाण्याचे साठे कसे तयार होतील त्यासाठी नियोजन करेल. तलाव, विहीरी, कालवे, धरणं, रस्ते कृषी मालाच्या बाजारपेठा धान्य साठवण्यासाठी कोठारं असे सगळे तो करून घेईल. राजा त्याचे नाणे काढील त्यांमुळे त्याचे त्याच्या संपत्तीवर नियंत्रण असेल. अशारितीने राजा त्याच्या विविध जबाबदार्या पाहिल. शांती पर्व भाग एकशे अठरावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे एकोणीसावा

युधिष्ठीर विचारतो, "आपण मला राजाच्या कामाची चांगली माहिती दिली आहे परंतु, ते सगळे लक्षात राहील अशा प्रकारे त्यांची नोद कोणी केली आहे कां"?

भिष्म सांगतात, राज्या कामात त्याला अशा रितीने कामं करावी लागतात कीं, त्याची सरळ नोंद करता येत नाही. एकमेकाविरुद्ध वाटणार्या डावपेचांचा त्याला उपयोग करावा लागत असतो. त्यासाठी मी तुला प्रथम सांगतो राजाची मुलभूत कर्तव्ये ती नीट ऐक. राज्यातील सर्व प्राण्यांचे संरक्षण हि क्षत्रियाची पहिली जबाबदारी असते. आता ते काम तो कसे करील त्याबद्दलचे नियम सांगतो, ते काम करण्यासाठी राजाच्या लोकांना विविध रुप घ्यावी लागतात. त्यासाठी सावधानता, लुच्चेगिरी, सत्याची चाड, कामात प्रामाणिकपणा असे गुण त्यांच्यात असावे लागतील. त्यांच्या कामाला लोकमान्यता मिळण्यासाठी त्यांचे काम चांगुलपणाने, माणूसकीने व भूतदयेने असे असले पाहिजे. तरच त्याला ते साध्य होते. कमी बोलणारा व जास्त ऐकणारा असे त्याचे रुप असले पाहिजे. आपले मत न सांगता इतरांची विविध मतं शांतपणे ऐकून घेणे हे त्याला जमले पाहिजे. त्यांचे वागणे असें असले पाहिजे कीं, लोकांना त्यांच्या बद्दल भरवसा वाढेल. जे हेर ऐकण्याचे काम करतील ते प्रत्यक्ष कारवाई करणार नाहीत ती दुसरे करतील. समाजातील दुर्जनांचे अड्डे त्यांना माहीत असतील. तेथे काय घडते त्याची खबर राजाकडे जाईल.

महसुलाच्या वसुलीसाठी राजा विशेष खबरदार असेल. कर बुडवणार्याला भारी सजा असेल. राज्याच्या संरक्षणासाठी त्याच्या शत्रूच्या शेतातील पीक त्याचे शिलेदार चोरून नेतील, तसेंच त्याचे पशुधन पळवतील. ह्या गोष्टी प्रत्यक्ष युद्धा पेक्षा कमी खर्चाच्या असतात. असे सगळे करतांना राजाचे अध्यात्मिक नुकसान होत नाही म्हणजे त्यात पाप नसते. असे केल्याने राजाची ताकद वाढत असते. शत्रूंवर आपले शिलेदार लुटारूच्या सोंगात तो नियोजनपूर्वकपणे पाठवून त्या राज्याचे स्वास्थ्य तो बिघडवून चाकील. त्यानतर त्यांच्यावर आपल्या वेतनी सैनिकांच्या मदतीने चढाई करून ते राज्य खालसा

करील. कर आकारणीत राजा चूक करत असेल तर त्यांने ती मान्य करावी व त्या वैश्याला नुकसान भरपाई द्यावी. असे केल्याने राजाची शान सुधारत असते. त्या बद्दल चूक करणार्या सेवकांस योग्य तो दंड करावा. गुप्त हेरांचे जाळे पसरवून तो स्वताचे संरक्षण करत असेल. राजाची सगळी पावलं सावध असतील. तो कोणी कांहीं सांगतो म्हणून करणार नाही. त्याच्या प्रत्येक कृतीचे कारण त्याला माहीत असले पाहिजे. आपण नेहमीच बोलणी करण्यासाठी तयार असतो अशी भूमिका त्याची शत्रूबरोर असली पाहिजे. परंतु, त्याच वेळी त्याच्या शत्रूच्या गोटात पोखरण्याचे त्याचे काम सुद्धा तसेंच होत असले पाहिजे. "तोंडात हरी व हातात सुरी", असे त्याचे धोरण शत्रूशी वागतांना असेल. राजाचे वागणे असे असले पाहिजे कीं, प्रत्येकाला तो त्याचा राजा आहे असे वाटले पाहिजे. राजाला त्याच्या प्रजेतील सगळे त्याचेच वाटले पाहिजेत. सगळ्यांशी त्याचे वागणे सारखेच असले पाहिजे. हा जवळचा हा दूरचा असे नसावे. अशा धोरणामुळे त्याची महती वाढत जाते. राजाला त्याची संपत्ती वाढवण्यासाठी आठ गुण असावे लागतात ते असे, धीरोदात्तता, चतुराई, संयम, बुद्धी, उत्तम आरोग्य, वेळ साधण्याची कला (संधीसाधूपणा), शौर्य, काळाचे भान. राजाचे आंतरिक दुष्मन असतात, हलगर्जीपणा, बेसावधपणा, घमेंड, अति आत्मविश्वास, उताविळपणा, हे पांच त्याने टाळावेत. त्यासाठी तो त्याच्या शत्रूंत हे दोष उत्पन्न होतील असे प्रयत्न करत असेल. कारण त्या दोषामुळें अपयश येत असते. वर दिलेले गुण राजाच्या मंत्र्यात सुद्धा असले पाहिजेत व दोष नसावेत म्हणजे तो चांगले राज्य करू शकतो. राजा कधीच निराशावादी नसावा. येणारे अपयश का आले ते त्याला अभ्यासावयाचे असते. त्याबाबत तो भावूक होणार नाही. लोभी मनुष्य धनहीन झाला तर त्याच्यात इतर दोष उत्पन्न होतात. म्हणून राजा लोभी नसावा. त्याच्या सगळ्या गरजा मर्यादेत ठेवणे त्याला जमले पाहिजे. अरे राजा, मी तुला सगळ्या गोष्टी राजाच्या कामा संदर्भात असलेल्या सांगितल्या आहेत. त्या तू चांगल्या लक्षात ठेव. ज्या राजाकडे इमानदार सेवक आहेत तो मोठ्या बलाढ्य राजाला सुद्धा हरवू शकतो. जरी भाग्य सर्वश्रेष्ठ असले तरी त्याचा जास्त विचार राजाने करावयाचा नसतो. कारण राजाचे कर्तृत्व त्याचे भाग्य बदलू शकते असे ब्रह्माने सांगितले आहे. त्याचे कारण भाग्य सुद्धा त्याच्याच कर्माचा

हिस्सा असतो. दैववादी राजा कधी यशस्वी होत नाही. राजा कर्मवादी असला पाहिजे. शांती पर्व भाग एकशे एकोणीसावा संपला.

# शांती पर्व
## भाग एकशे विसावा

युधिष्ठीर विचारतो, आपण मला राजाच्या कामांबद्दल सगळे सांगितले आहे. त्या प्रमाणे न्यायदानाचे कार्य हे महत्वाचे कार्य राजाचे असते. न्यायावर सगळे राजाचे कार्य अवलंबून असते. त्याचा अर्थ न्याय देणे व त्यासाठी चाबूक वापरणे हे ऋषी, राजे, देव, यक्ष, पितर राक्षस आणि पिशाच्च अशा सर्वांसाठी सारखेच महत्वाचे असते. सगळ्याच जीवांच्या सुखी जीवनाचे रहस्य त्या न्यायात आहे. जेथे अन्याय होतो तेथे दुःख उत्पन्न होते. न्यायामुळे जीव, असुर, माणसे, देव वगैरे सुखाने जगू शकतात. आता हा न्याय म्हणजे नेमके काय व विविध परिस्थितीत तो कसा आचरणात आणावयाचा त्या बद्दल सांगा. त्याच्या एकंदर स्वरुपाची मला आपण कल्पना द्याल तर बरे होईल. तो सक्षम कसा ठेवावयाचा व त्यात कोण सहभागी असतील? त्याच्यासाठी कोण सदैव जागृत रहातो? कशावर त्याचे कार्य विसंबून असते? त्याची कार्यपद्धती कशी काम करते?

भिष्म सांगता, ऐक सगळे मी सांगतो, न्यायासाठी जी व्यवस्था केली आहे त्याला कायदा (व्यवहार) असे म्हणतात. चांगुलपणा, माणूसकी व भूतदया ह्या पुण्य कमावण्याच्या धोरणांची अंमलबजावणी करणे सोपे जावे म्हणून जे नियम केले आहेत ब्रह्मांने, जे पुढे राजे त्यांच्या अक्कलेनुसार त्यांच्या राज्यात आचरणात आणतात त्या नियमांना व्यवहार अथवा कायदे असे म्हणतात. व्यवहार शब्द वि+अवहार अशा दोघांपासून बनला आहे. अवहार म्हणजे अयोग्य कार्य, ज्या नियमांच्या अनुशासनामुळे चुकीची काम टाळता येतात ते नियम म्हणजे कायदा त्यामुळे संबंधितांना सुरक्षा मिळते. ते तयार करण्यात प्राचीन ऋषी मनू ह्यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या अनुशासनामुळे सगळे चराचर त्यांचे कार्य सुरक्षितपणे करू शकतील असे त्यांना वाटत होते. ते प्रथम ब्रह्मांने मनूला ऐकवले असे सांगतात. म्हणून ते पहिले शब्द आहेत असेसुद्धा समजण्याची प्रथा आहे. व्यवहाराच्या आचरणामुळे अन्याय होत नाही म्हणून ते न्यायाच्या कामात महत्वाचे ठरतात. राजाच्या चाबकाचे कार्य ह्या व्यवहारानुसार होत

असते. कवी मनाचे त्याला एक स्वरुप देतात त्याचे वर्णन मी आता तुला सांगतो, तो अग्नीसारखा तेजस्वी आहे, त्याचा रंग निळ्या कमळासारखा आहे, त्याला मोठे सुळ्या सारखे दात आहेत, त्यातील चार दात मुखाबाहेर आलेले आहेत, त्याला चार हात व आठ पाय आहेत, त्याला अनेक डोळे आहेत, त्याला राक्षसांसारखे टोकेरी कान आहेत, त्याच्या डोक्याचे केस सुद्धा राक्षसासारखे ताठ उभे आहेत, त्याच्या डोक्यावर केसाच्या जटा आहेत, त्याला दोन जिभा आहेत, त्याचे मुख तांबडे आहे, त्याच्या अंगावर सिंहाच्या कातड्याचे वस्त्र आहे. ती एक भयंकर दिसणारी देवता आहे असे सांगतात. कधी ती चाबकाचे, कधी तलवारीचे अशी विविध रुप घेत असते असेसुद्धा सांगतात. कधी तिच्या हातात कुर्हाड, सोटा, अशी विविध शस्त्र असतात ज्यांच्या मदतीने ती न्याय देण्याचे कार्य करत असते. अन्याय निवारण्यासाठी ती देवता सर्वकडे फिरत असते. राजा तिचा हस्तक असतो. तिच्या अंमलबजावणीने समृद्धी, सुख, समाधान, उत्कर्ष, यश सज्जनांसाठी प्राप्त होत असते. ती दिसायला रागीट दिसते परंतु, ती खरेतर न्यायाने वागणार्यांसाठी सहानुभूतीच्या रुपाने दिसत असते. अशी ही देवता (न्याय देवता) ब्रह्माच्या हातातून बाहेर आली असे मनू सांगतात. सगळी वेदवाणी तिच्यात असते. ती रुद्राचा आत्मा आहे. तिच्या कृपेमुळे विष्णू सृष्टीवर स्वामित्व करत असतो. तेंच नारायणाचे एक रुप आहे. त्या देवतेचे रुप भयंकर असते म्हणून त्याला कांहीं ऋषी महापुरूष असे सुद्धा सांगतात. त्याची बायको जिला निति म्हणतात ती ब्रह्माचीच मुलगी आहे. न्याय देवतेत कृपा आहे, सजा आहे, पतप्रतिष्ठा आहे. सगळे चांगले गुण त्यातून उत्पन्न होतात. तिच्यात सुदैव आहे. मुक्तीचा मार्ग त्यातून निघत असतो. सगळ्या तपस्या, त्याग, बैराग्य, व्रतस्थता त्यात समाविष्ट असतात. सगळी पापाची रुप त्यात एका बाजूला व पुण्याची रुपं दुसर्या बाजूला अशी दिसत असतात. खोटेपणा, सच्चाई, नम्रता, उद्धटपणा, धिरोदात्तता, सामर्थ्य आणि असामर्थ्य असे दोनही त्यात असतात. ते काळांचे एक रुप आहे असे कांहीं सांगतात. अशारितीने त्या व्यवहार देवाचे वर्णन ऋषी करत असतात, युधिष्ठीरा. जर न्याय नसेल तर अन्यायाचे राज्य सगळ्या पृथ्वीवर पसरले असते आणि जेथे तो देव नसतो तेथे अराजक व पाप ह्यांचे साम्राज्य आजही दिसून येते. केवळ त्या चाबकाच्या

भयामुळे सगळे सज्जन होतात आणि पुण्य मार्गाने जातात. नाहीतर कली माणसाला कधीच चांगले काम करू देणार नाही जेव्हां, त्याच्या मदतीला रजो व तमोगुण असतात. समाजातील सात्त्विक लोकाच्या आधाराने ती देवता काम करत असते. म्हणून राजा सात्त्विक असावा लागतो. जो राजा त्याचा न्यायदंड योग्यप्रकारे वापरतो तो यशस्वी होतो. त्याच्यामुळे चांगुलपणा, माणूसकी व भूतदया आचरण्यात येते आणि समाजाचा पुण्यप्रभाव वाढत असतो. वेदांत त्याचे बरेच वर्णन आहे. पुण्यप्रभाव वाढला कीं, नेमका पाऊस पडतो व सगळी पिके चांगली येतात. पशु चांगले पोसले जातात व माणसाला त्याचे खाद्य मिळते. न्यायदंडाची जबाबदारी इंद्राने क्षत्रियांवर टाकली आहे. राजा ती जबाबदारी योग्य सांभाळेल तर त्याचे राज्य सुखी व समृद्ध होते. त्या सत्तेचा चुकीचा वापर जर झाला तर यथावकाश ती न्यायदेवता त्या राजास दंड करते व तो बरबाद होतो.

राजाकडे ते नऊ असावे लागतात जसे, हत्तीदल, घोडेदल, रथदल, पायदल, पाण्यातून जाणार्या होड्या, सहाय्यक शुद्र सेवक, शस्त्रास्त्र, प्रजेचा आधार आणि धनसंपत्ती असे आहेत. त्याशिवाय न्यायाधीश, जोगी, ज्योतिषी, कलाकार, यज्ञ करणारे ऋग्विज, दोस्त, धान्याचा साठा, मौल्यवान खजिना, इतर सामानसुमान असे नऊ असावे लागतात. न्याय करणे व त्यासाठी ताकदीचा उपयोग करणे हे क्षत्रियाचे कार्य सांगितले आहे. परंतु, जर तो त्याविरुद्ध त्याची शक्ती वापरतो तर तो पापी ठरतो व न्यायदेवता त्याला यथावकाश संपवून टाकते. ब्राह्मणाचे कार्य क्षत्रियांना त्या कामात मार्गदर्शन करण्याचे असते. व्यवहारातूनच वेद उत्पन्न झाले असे कांहीं ऋषी सांगतात. न्यायासाठी जे साधन लागते त्याला पुरावा, साक्षीदार, परिस्थिती अशा तीन गोष्टी आवश्यक असतात. त्यांच्या मदतीने न्यायाचे काम होत असते. पुरावा हा न्यायाचा आत्मा असे समजतात. त्याच्याशिवाय न्याय करता येत नाही. त्यांच्या मदतीने न्याय करता येतो त्यात परिस्थिती व साक्षीदार सुद्धा असतात. त्यात खोट होऊ शकते म्हणून ते पुराव्या इतके महत्वाचे मानले जात नाहीत. न्याय दानासाठी परस्पर विश्वास असावे लागतात. म्हणून विश्वास तेवढाच महत्वाचा असतो. अशा न्यायापेक्षा कोणी मोठा नसतो, राजासुद्धा. शांती पर्व भाग एकशे विसावा संपला.

# शांती पर्व
## भाग एकशे एकविसावा

भिष्म सांगतात, ह्यासंदर्भात मी एक किस्सा तुला सांगतो, अंग लोकात एक तत्त्वनिष्ठ राजा होता. त्याचे नांव होते वसुहोम. तो फार दयाळू होता. स्वताच्या पत्नीसह तो मोठी अवघड व्रते आचरत होता. तो एकदा मुंजप्रस्थाला गेला होता जेथे मोठे ऋषी रहातात. तेथे पितरसुद्धा असतात. ते हिमालयाच्या एका शिखरावर वसलेले आहे. तेथे एका वडाच्या झाडाखाली तो बसला होता. ती रुद्राची खास जागा होती. म्हणून त्याला मुंजप्रस्थ असे नांव मिळाले होते. राजा वसुहोम तेथे तपस्या करून ब्राह्मणत्व प्राप्त करतो. त्याला देवर्षीचा किताब सुद्धा मिळतो. एके दिवशी स्वर्गाचा राजा इंद्र त्याचा मित्र राजा मंधत्री वसुहोमाला भेटण्यास त्या वडाच्या झाडाकडे जातो. मंधत्री वसुहोमाला घोर तपस्येत बसलेले पहातो. त्याच्यापुढे तो नम्रपणे उभा रहातो. वसुहोम त्याला त्याचे पाय धुण्यासाठी देतो. त्यानंतर दुध मध आणि तुपाचे त्याला अर्घ्य देतो. त्याच्या कुशलक्षेमाची चौकशी करतो. तो त्याच्या राज्यातील सात आधारांची चौकशी करतो. त्याच्या राज्यातील न्याय व्यवस्थेची चौकशी करतो. तो सांगतो कीं, त्याची अंमलबजावणी करतांना जे घडते ते दुष्ट वाटत असले तरी त्यात पाप नसते कारण त्यामुळे मोठे पाप टाळण्याचे काम होत असते. लोकहीतासाठी ते राजा करत असतो. त्यात त्याचा स्वार्थ नसला पाहिजे. त्यांच्यात जे संभाषण झाले ते सांगते,

मंधत्री बोलतो, "अहो राजर्षी, मी सगळी बृहस्पती संहिता न्यायदंडाबद्दलची अभ्यासली आहे. ऋषी उशनाने दिलेले सुद्धा मी अभ्यासलेले आहे. परंतु मला न्याय दंडाच्या संकल्पनेची सुरूवात कोठून झाली ते समजून घ्यावयाचे आहे. त्यात क्षत्रिय कसे गोवले गेले, त्याची मर्यादा काय आहे"? "मला ते सगळे सांगा. मी आपल्याला गुरूदक्षिणा देण्यास तयार आहे परतु, ह्या विषयात मला तयार करा".

वसुहोम बोलतात, "ऐक मी काय सांगतो ते, न्यायदंड ज्यांमुळे मानवता शाबूत आहे त्याची सुरूवात कशी झाली ते सांगतो. चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया ह्या शाश्वत तत्त्वावर आधारीत आहेत हि न्यायदंडाची व्यवस्था. ब्रह्मा त्याचा पुरस्कर्ता आहे.

एकदा ब्रह्मा एक यज्ञ करावयाचा होता. त्याला पुरोहीत मिळत नव्हता जो ब्रह्मा एवढा उच्च असेल. ते शोधण्यात बरीच हजारो वर्षे गेली. त्यानंतर एकदा ब्रह्मदेव शिंकले, त्यांच्या शिंकेतून एक गर्भ बाहेर पडला. त्याला ब्राह्माने नांव दिले क्षूप. तो मोठा झाला व सगळ्या प्राणीमात्रांचा त्राता झाला. ब्रह्माने क्षूपाला यज्ञाचा पुरोहित म्हणून नेमले. ते होत असतांना न्यायदंड देवता गायब झाली. ती गायब झाल्यामुळे सगळे चराचर चिंता करू लागले. त्या तिच्या गायब होण्यामुळे लोकांना योग्य व अयोग्य ह्याबद्दल सांगणारे कोणी राहिले नाही. सगळे प्राणी एकमेकांवर थोड्या थोड्या गोष्टींसाठी भांडू लागले कायदा राहीला नाही. बळी तो कान पिळी असे झाले. सगळे भयभीत होऊन जगू लागले. ब्रह्माचा यज्ञ झाला त्यानंतर ते विष्णूला बोलतात, "अरे केशवा, जरा लक्ष दे ह्या चराचरांकडे, न्यायदेवता गैरहजर गायब झाली आहे. ते ऐकल्यावर ती प्रथम देवता त्याच्या हातात चाबूक घेऊन निघते. त्याच्यातील चांगुलपणा, माणूसकी व भूतदयेने एक न्यायदेवतेचे रुप घेतले. त्यानंतर लोकांना हायसे वाटले आणि तो अन्यायाचा गोंधळ संपला. त्या नवीन न्यायदेवतेचे रुप सरस्वतीचे होते. त्यात तिचे पाय पुण्य प्रभावाचे होते. ती सरस्वती त्यानंतर दंडनिती लिहून काढते. तिच्या हातात मोठा सुळा होता ज्याने ती नियम मोडणार्यांना (सुळ्यावर चढवून) मारून टाकत असे. त्यानंतर इंद्र तिचा सल्लागार म्हणून नेमला गेला. यम विवस्वाताचा मुलगा, पितरांचा मुख्य नेमला गेला. कुबेर धनाचा नियंत्रक नेमला गेला. मृत्यूला जीवनाचा मुख्य म्हणून नेमले गेले. अग्नी सगळ्या सृष्टीची उर्जा म्हणून नेमला गेला. महादेव अर्थात, इशान सगळ्या रुद्रांचा मुख्य झाला जे न्यायाचे अंतिम रुप आहेत. वसिष्ठ सगळ्या ब्राह्मणांचे गुरू नेमले गेले. जतदेव वसुंचा मुख्य झाला. सूर्य तेजाची देवता झाला. चंद्रमा सगळ्या तारकांचा मुख्य झाला. अंशुमत सगळ्या वनस्पतींचा मुख्य झाला. त्या सगळ्यांवर स्कंध नजर ठेवून होता. त्याला सगळी भूतं मदत करणार होती. त्यांचे कार्य वाढ आणि नाश असे दुहेरी होते. न्यायदेवता क्षूप झाला. तो चार अंगांचा (शस्त्र, व्याधी, अवहार, मृत्यू) नियंत्रक होता. श्रृती सांगतात कीं, महादेव जो देवांचा देव आहे, त्याच्या हातात सुळा घेऊन रुद्रांचे स्वामित्व करत असतात. परंतु, नंतरच्या काळात ते ब्रह्माच्या रुद्राकडून क्षूपाकडे गेले. त्या यज्ञाच्या पूर्तते नंतर आवश्यक त्या विधी

करून तो न्यायदंड विष्णूच्या हातात देतात. त्याच्या कडून तो अंगिरसाच्या हातात जातो. अंगिरस तो इंद्र आणि मरिचीकडे सुपूर्द करतो. मरिची तो भृगूकडे सोपवतो. भृगू तो त्यानंतर ऋषींच्या कडे देतो. ऋषी तो पुण्याईच्या संरक्षणाचा चाबूक ब्राह्मणांकडे देतात. ते तो पुन्हा क्षूपाकडे देतात. क्षूप तो मेनूकडे देतो. जो सूर्याचा मुलगा आहे. तिला श्राद्ध देवता असेसुद्धा समजतात. ती श्राद्ध देवता तो चाबूक त्याच्या मुलांकडे सोपवते. न्यायाचा चाबूक चुकीच्या रितीने वापरला जाणार नाही ह्याची दक्षता बाळगण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते नाहीतर तो चाबूक न्याय देण्याऐवजी अन्याय करण्यासाठी वापरला जाऊन कलीचे फावणार असते. त्याचा उपयोग राजाचा खजिना भरण्यासाठी नसतो हे राजांना समजले पाहिजे. त्याच्या शिक्षा समाजात सुधारणा करण्यासाठी म्हणजे एका प्रकारे शैक्षणिक स्वरुपाच्या असल्या पाहिजेत म्हणून त्याला शिक्षा असे म्हणतात. कोणाला ठार मारून, कोणाला अपंग करून, कोणाचे धन हिरावून घेऊन असे करून जर समाजात पुण्यमार्गाचा प्रचार होणार नसेल तर ते सगळे व्यर्थ असते. नाहीतर तो चाबूक स्वतःच अन्याय करणारा ठरेल तसे होणार नाही ह्याची दक्षता राजाला पहावयाची असते. सूर्याचा मुलगा मेनू त्याच्या मुलांना तो चाबूक देतो. त्यांना सांगतो की, त्याच्या मदतीने जगात न्यायाचे शिक्षण पसरवावे. तो चाबूक कोणाच्याही हातात असला तरी त्यावर इंद्राचे लक्ष असते. त्याशिवाय अग्नी, वरुण, प्रजापति असे देव सुद्धा ते काम करत असतात. लोकांना पुण्य मार्गाकडे वळवणे हा एकमेव उद्देश त्याचा असतो. शेवटी ते काम माणसांत राजाकडे दिले गेले व त्याच्या करता क्षत्रिय तो चाबूक वापरून समाजात न्यायाचे राज्य आणण्याचे काम करत आहेत. इतर प्राण्यांचे संरक्षण करण्याचे कार्य क्षत्रियांना करावे लागते केवळ माणसाचे संरक्षण करणे एवढाच क्षत्रियांचा कार्यभाग नसतो. त्या चाबकावर महादेवाचे लक्ष असते त्यावेळी त्याची अनेक नांव असतात ती अशी, कपर्दीक, शंकर, रुद्र, भव, स्थानू, उमापति.

भिष्म पुढे सांगतात, जे वसुहोमाचे हे आख्यान मनापासून ऐकतात ते भाग्यवान होतात. मी तुला त्या न्यायाच्या चाबकाबद्दल सगळे सांगितले आहे. ते समजून तू तुझ्या राज्याचे काम पहाशिल असे मी समजतो. शांती पर्व भाग एकशे एकविसावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे बाविसावा

युधिष्ठीर बोलतो, मला पुण्य, संपत्ती आणि सुख ह्या तिघांच्या प्राप्ती बाबतचे विधान समजून घ्यावयाचे आहे. ह्यांपेकी कोणते जास्त महत्वाचे असते जीवाच्या समृद्धीसाठी ते सांगा. बर्याच वेळा त्यांचे एकमेकात गुंतलेले असणे स्वाभाविक असते. त्याची कारणे कोणती व त्याच्या पासून अखेरीस निष्पत्ती काय ते सांगा.

भिष्म सांगतात, जेव्हां कोणी शुद्ध मनाने कोणाचेही नुकसान न करता संपत्ती कमवण्याचा प्रयत्न करतो तेव्हां ते कार्य पुण्यमय समजले जाते कारण त्यात ती धोरणे (चांगूलपणा, माणूसकी व भूतदया) आचरण्यात आलेली असतात. संपत्तीची मूळ जेव्हां तशी असतात तेव्हां, सुख सुद्धा मिळत असते. त्यामुळे तशा परिस्थितीत पुण्य, सुख व संपत्ती एकत्र नांदत असतात. त्या सगळ्यांच्या मुळाशी असते इच्छा. तिची विविध रुप ते सगळे ठरवत असतात. सुख हे इंद्रियांचे असते म्हणजे, ते सगळे माणसाच्या वासनांशी जोडलेले असतात. जेव्हां कोणी ज्ञान मिळवण्यासाठी प्रयत्न करतो तेव्हां ते मिळाले तर त्याला सुख मिळते व तींच त्याच्यासाठी संपत्तीसुद्धा असते. म्हणजे तेथे पुण्य वेगळे असते. जेव्हां कोणी पाप करून सुख मिळवतो त्याला पुण्य मिळत नाही. जे सुख मिळते ते त्याची संपत्ती ठरते. अशा वेळी तो पापात्मा ठरतो. मनूच्या न्यायानुसार तसे सुख मिळवणे वर्ज्य आहे. त्याला अन्याय म्हणतात. पुण्याचा मार्ग नेहमीच संपत्ती अथवा सुख देत नसतो. म्हणून माणसाला ते तीन सदैव आचरण्यात आणणे वाटते तितके सोप नसते.

संपत्ती मिळवण्यात नेहमी जे करावयाचे असते त्यात सुख बर्याच वेळी नसते. परंतु, पीक आले कीं, त्याला सुख व संपत्ती दोनही मिळत असते. नाही आले तर त्याला दुःख मिळत असते. बर्याच वेळी संपत्ती कुमार्गाने अधिक मिळत असते. तेव्हां त्यातून कांहीं सुख सुद्धा मिळते पण त्यात पुण्य नसते. अशी संपत्ती पापमय समजली आहे धर्मांने. म्हणजे जे सुख व जी संपत्ती पुण्यमार्गाने मिळाली ती धर्मग्राह्य असते. खोट्या मार्गाने सुख अथवा संपत्ती मिळवणे धर्मबाह्य समजले आहे. ते मार्ग अनुचित समजले

गेले आहेत. म्हणून पुण्य हे ह्या तिनात जास्त महत्वाचे ठरते. कारण ते माणसाला मुक्ती मार्गात मदत करणारे असते. वेदातील शिकवणूक अशी सांगते कीं, मोक्ष मिळवणे हे प्रथम उद्देश असले पाहिजे. शरीराच्या सुखाचा उद्देश त्यानंतर असतो. जे शरीर सुखाला जास्त महत्व देतात ते रजोगुणी व त्याहूनही खालचे म्हणजे तमोगुणी समजले जातात. धर्म सांगतो कीं, माणसाने सत्त्वगुणीच असले पाहिजे व त्यासाठी स्वतामध्ये जरूरीचे बदल करून घेण्याचा प्रयत्न त्याने सतत केला पाहिजे. त्या संदर्भात एक संवाद मी तुला सांगतो जो ऋषी कमंड आणि अंगरिष्टात झाला होता. एक दिवस अंगिरष्ट कमंडाला नमस्कार करण्यासाठी जातो. तो त्याला प्रश्न विचारतो, "जर समजा राजा त्याच्या वासनाच्या आवेगात येऊन कांहीं गैर कृत्य करतो व नंतर त्याला पश्चात्ताप होतो, अशावेळी तो ते पाप कसे धूवून टाकू शकतो"? त्याचा दुसरा प्रश्न होता, एक मनुष्य वाईट कृत्य त्याच्या अज्ञानामुळे चांगले समजून करतो व तसे तेथील लोक चुकीच्या जाणीवेमुळे करत असतील तर राजा ते कसे थांबवू शकेल"?

कमंड सांगतात, जो केवळ सुखासाठी चांगल्या वाईटाचा विचार न करता धडपडत असतो त्याचा विवेक नष्ट झालेला असतो. त्यामुळे तो पुण्य व संपत्ती दोनही घालवून बसतो. तो फक्त सुखाचा ध्यास करत असतो. असे लोक रजोगुणी अथवा तमोगुणी असतात. एकदा त्यात तो रमला कीं मग त्याला कसलीच मर्यादा रहात नाही. तो मोक्ष वगैरे बद्दल विचार करत नाही. असे लोक नास्तिक होतात. ते फक्त शरीराचा विचार करत असतात. मोक्ष, मुक्ती ह्या गोष्टी त्याच्यासाठी निरर्थक असतात. राजाने ती प्रवृत्ती त्याच्या समाजात वाढू दिली तर अनर्थ होतो. ते लोक राजाला, नैतिकमुल्यांना मानत नाहीत आणि समाजातील पुण्य कमी होऊन तो समाज पुढे बरबाद होतो. ते होऊ नये म्हणून राजा त्याच्या समाजात पहिल्या पासून वेदाचे संस्कार प्रजेत बिंबवण्याचा प्रयास करील योग्य शिक्षण व्यवस्था चारही वर्णांत अमलात आणून. पुण्यमार्गींचे तो विशेष कौतुक करेल. बिघडलेले लोक त्याच्या राज्या बाहेर हाकलून देईल. जे बदलण्यास तयार आहेत त्यांना माफ करून एक संधी देईल.

शांती पर्व भाग एकशे बाविसावा संपला.

# शांती पर्व
## भाग एकशे तेविसावा

युधिष्ठीर विचारतो, लोक पुण्यवंतांचे कौतुक करतात परंतु, माझा त्यांच्या प्रशंसेवर विश्वास नाही. ते खोटे असावे असे मला वाटते. पुण्यवंत वागणूक कशी अंगिकारावयाची त्या करता कोणते निर्बंध स्वीकारावयाचे ते सांगा. चांगली वर्तणूक म्हणजे काय ते सुद्धा सांगा.

भिष्म सांगतात, दुर्योधन तुम्हा पांडवांचे वैभव पाहून तडफडत होता, तेथे त्याची तुम्ही मस्करी करत होता. हे तुला आठवत असेल. तो त्याच्या पित्याला हांच प्रश्न विचारतो. त्यांच्यात जे संभाषण झाले ते सांगतो. दुर्योधनाचे ते द्वेषाने तडफडणे ऐकल्यावर धृतराष्ट्र त्याला बोलतो, "अरे तू कां त्याच्या नावांने तडफडत आहेस, तुझ्या द्वेषाचे कारण समजल्यावर मी तुला पुढे काय करावयाचे ते सांगेन. तुझ्याकडे काय कमी आहे"? मांसाने भरलेले स्वादिष्ट जेवण तू खात असतोस. तुझ्या अंगावर उंची वस्त्रं आहेत, तुझ्याकडे उत्तम प्रकारचे घोडे आहेत, असे सगळे असतांना त्यांच्यावर तू कां मत्सर करत असतोस ते मला समजत नाही. *मांसाहार श्रीमंती आहार समजला जात होता व शाकाहार सामान्य जनांचा आहार समजला जात होता.*

दुर्योधन सांगू लागतो, त्यांच्याकडे दहा हजार उत्तम स्नातक त्याच्या राजवाड्यात मांसादि स्वादिष्ट पदार्थ सोन्याच्या ताटात खात असतात. त्याच्या वाड्याची सजावट सुंदर फुलांनी केलेली असते. त्यांच्याकडे तित्री आणि कल्माश प्रजातीचे घोडे आहेत. त्यांच्या अंगावरील झगे मी कधी पाहिलेले सुद्धा नाहीत. असे सगळे माझ्या शत्रूचे वैभव मला खात आहे. जणू काय ते दुसरे वैश्रावण झाले आहेत. ते पाहून मला त्यांचा तिरस्कार वाटू लागला.

धृतराष्ट्र त्याला सांगतात, अरे दुर्योधना, जर तुला तशी संमृद्धी पाहिजे तर त्यांच्या प्रमाणे तू उत्तम गुणी व्हावयाला पाहिजेस. चांगल्या वागणूकीने कोणी सारे जग आपले करू शकतो. मंधत्रीने सगळे जग जिकले ते केवळ उत्तम गुणांमुळे. जनमेजयाने केवळ तीन दिवसात आणि नभगाने सात दिवसात जग आपलेसे केले होते. त्यांच्यामध्ये

भूतदया होती. ते निष्पाप्याबद्दल सहानूभूतीने वागत होते. त्यामुळे ते सगळे जग जिंकत होते. त्याना सगळे आपले समजत होते. जर तुला तसे वागता आले तर तूसुद्धा पांडवांपेक्षा श्रेष्ठ होशिल.

दुर्योधन त्याच्या पित्याला विचारतो, "मला सांगा तात, ते कोणते गुण आहेत ज्यांच्यामुळे ते प्राचीन राजे इतक्या झपाट्याने सगळे आपलेसे करत होते"?

धृतराष्ट्र सांगतात, "त्या संदर्भात मी तुला एक जुनी कथा सांगतो, ती मला नारदांनी सांगितली होती. ती अशी, दैत्य राजा प्रह्लाद त्याच्या चांगुलपणास, माणूसकी व भूतदया ह्या गुणत्रयीने इंद्राचे पद जिंकले होते. तेव्हां इंद्र बृहस्पतीकडे जातो व हात जोडून बोलतो, "मी तुमच्या कडून ऐकू इच्छितो सुखाचा खरा मार्ग कोणता"?

बृहस्पती सांगतात, "ज्या ज्ञानामुळे मोक्ष प्राप्त होतो ते ज्ञान सुखाचा खरा मार्ग आहे".

इंद्र विचारतो, "त्यापेक्षा दुसरे कांहीं असते कां"?

बृहस्पती सांगतात, "होय त्याही पेक्षा श्रेष्ठ एक आहे, त्याबद्दल महर्षी उशनस तुला चांगले सांगतील. त्यांच्याकडे जा". त्यानंतर इंद्र तेथे जातो. तेथे तो ते शिकतो. ते शिकल्यानंतर इंद्र पुन्हा भार्गवांना विचारतो, ह्याही पेक्षा उच्च कांहीं असेल तर तेसुद्धा सांगा. तेव्हां भार्गव त्याला सांगतात, आहे परंतु, त्याची माहिती प्रह्लादाकडेच आहे, त्याला जाऊन भेट.

इंद्र एका ब्राह्मणाचे रुप घेऊन दैत्य प्रह्लादाकडे जातो. तेथे त्याला सांगतो कीं, मला उच्च दर्जाचे सुख कसे मिळवावयाचे ते आपल्याकडून शिकावयाचे आहे.

प्रह्लाद सांगतो, मला तुला सांगावयाला वेळ नाही. मी हल्ली तीन जग सांभाळावयाच्या कामात व्यस्त झालो आहे. इंद्र त्याला बोलतो, "ठीक आहे, जेव्हां तुम्हाला समय असेल तेव्हां मला सांगा चांगुलपणाचा मार्ग कोणता आहे".

प्रह्लाद ते ऐकून त्याची तयारी दाखवतो. त्या नंतर जसा समय मिळेल तसे तो त्याला सांगू लागला. इंद्र ब्राह्मणाच्या रुपात प्रह्लादाचा शिष्य बनून ते शिकत होता. तो प्रह्लादाची जशी शिष्य गुरूची सेवा करतो तशी सेवा करू लागला. त्यावेळी इंद्र त्याला विचारतो कीं, "मला सांगा, सगळ्या जगाची सार्वभौम सत्ता तुम्ही कशी प्राप्त केली"?

प्रह्लाद सांगतो, "मला गर्व अजिबात नाही. मी जे करतो ते सगळे माझ्याकडून करून घेतले जात आहे ब्रह्माद्वारा अशी भावना ठेवून प्रामाणिकपणे ते करत असतो. मी गुणीजनांचा सन्मान करतो. मी त्यांचे मत समजून घेण्याचा प्रयत्न करत असतो. ते त्याना जाणवते व म्हणून ते मला मानतात. मी शुक्राच्या आदेशांचे पालन करत असतो. ब्राह्मणांचा व वरिष्ठांचा मी नेहमी आदर करतो, माझ्या मनात कोणाबद्दल सुद्धा आकस नाही. मी भूतदया व चांगुलपणा माझ्या वर्तनात बाळगून रहात असतो. मला क्रोध नाही. माझ्या वासना पूर्णतया मर्यादीत असतात. त्यामुळे माझी पहाण्याची दृष्टी शुद्ध असते. कोणालाही मी त्यामुळे आपलासा वाटू लागतो. त्यातच माझा विजय असतो. मी कोणालाही नीच समजत नाही. कोणालाही द्वेषाने पहात नाही. मुख्य म्हणजे मी माझी कोणाशी तुलना करत नाही ज्यामुळे मद व मत्सर उत्पन्न होतात. मला लोभ आणि मोह उरलेले नाहीत. त्यामुळे मी त्या सहा दोषांपासून मुक्त असतो जे शरीराचे असतात. असे सांगितल्यानंतर प्रह्लाद इंद्राला बोलतात कीं, तो त्याच्या सेवेमुळे संतुष्ट झाला आहे व विचारतो कीं, त्याला त्याच्या कडून काय पाहिजे. ते ऐकल्यावर इंद्र बोलतो, "तुम्ही आधीच मला सगळे दिले आहे पण जर तुमची तशी इच्छा असेल तर मला तुमचा स्वभाव प्राप्त व्हावा असे करा. तोंच तुमचा आशिर्वाद असे मी समजेन". प्रह्लाद तो देतो त्यानंतर त्याला कसेसेच वाटू लागते. तो बेचैन होतो. इंद्र त्या ब्राह्मणाच्या रुपात तेथून निघून जातो. तो बेचैनीत असतांना त्याच्या अंगातून एक ज्योत बाहेर येते. प्रह्लाद त्या ज्योतीला विचारतो तू कोण आहेस? ती ज्योत सांगते, मी तुझ्यातील भूतदया आहे. आता मी त्या ब्राह्मणांकडे जात आहे. त्यानंतर थोड्या वेळांनी आणखीन एक ज्योत त्याच्यातून निघते. प्रह्लाद तिला विचारतो तू कोण आहेस? ती ज्योत सांगते मी तुझ्यातील चांगुलपणा व माणूसकी आहे आता मी त्या ब्राह्मणाकडे जात आहे. थोड्या वेळांनी आणखीन एक ज्योत प्रह्लादाच्या अंगातून निघते. प्रह्लाद तिला विचारतो तू कोण? ती सांगते मी सत्यवाद आहे. आता मी त्या ब्राह्मणाकडे जात आहे. त्यानंतर आणखीन एक ज्योत त्याच्या अंगातून निघते तिला प्रह्लाद विचारतो तू कोण जात आहेस माझ्यातून त्या ब्राह्मणाकडे ते सांग, ती ज्योत सांगते, मी चांगले कृत्य, सत्कर्म आहे. आता मला त्या ब्राह्मणाकडे जावे लागणार कारण मी जेथे सत्यवाद तेथे असते. त्यानंतर

सामर्थ्य नांवाची ज्योतसुद्धा प्रह्लादाकडून निघून जाते. त्यानंतर समृद्धी नांवांची ज्योत त्याच्यातून निघते. ती सांगते जेथे सामर्थ्य असते तेथे मी असते. म्हणून मी आता त्या ब्रह्माणाकडे जात आहे.

प्रह्लाद सत्याला विचारतो तो ब्राह्मण कोण होता? ते सांगतात कीं, तो ब्राह्मण साक्षात इंद्र होता व त्याने तुझी सगळी शक्ती युक्तीने काढून घेतली आहे. आता तू ही तीन जग सांभाळू शकणार नाहीस. इंद्राने ब्राह्मणाचे सोंग घेऊन तुझ्याकडून तुझ्या यशाचे गमक समजून घेऊन तुला फसवले आहे. भूतदया, चांगुलपणा व माणूसकी, सत्यवाद (खरेपणा), सत्कर्म, सामर्थ्य आणि वैभव असे सगळे एकमेकांवर अवलंबून असतात. ते त्या क्रमाने प्राप्त होतात असे समजतात.

भिष्म पुढे सांगतो, ते सांगितल्यावर समृद्धी देवता त्याला सोडून जाते. ते ऐकल्यावर दुर्योधन त्याच्या पित्याला विचारतो, "मला सांगा चांगले वागणे म्हणजे काय असते"?

धृतराष्ट्र सांगतात, मी तुला थोडक्यात ते सांगतो, पहिले म्हणजे कोणाला कशाही प्रकारे विनाकारण त्रास द्यावयाचा नाही. भूतदया हा त्याचा गाभा आहे. गम्मत म्हणूनसुद्धा ते करावयाचे नसते. जे केल्याने शरमिंदे व्हावे लागेल असे कांहीं करावयाचे नसते. त्यात चांगुलपणा व माणूसकी येतात. तसे करण्यात सगळे दैविक सामर्थ्य सामावलेले असते. हे नियम मोडणारे जी समृद्धी व सुख मिळवतात ते पापकारक असल्याने ते लोक मोक्षापासून दूर जात असतात. त्यांनी मिळवलेली समृद्धी अल्पकाळ रहाते.

धृतराष्ट्र पुढे त्याला सांगतात, हे समजून जर तू चांगला वागलास तर पांडवांप्रमाणे तू सुद्धा तसाच समृद्ध होशिल व तुला त्याचा हेवा करण्याची आवश्यकता रहाणार नाही.

शांती पर्व भाग एकशे तेविसावा संपला.

# शांती पर्व
## भाग एकशे चोविसावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "तुमच्या मते स्वभाव वर्तणूक महत्वाची असते, ते समजले परंतु, मला सांगा माणसाच्या आशा कशातून उत्पन्न होतात"? मला दुर्योधनात मोठी आशा (अपेक्षा) होती परंतु, तो चुकीच्या अपेक्षांमुळे बरबाद झाला आहे. माणसाच्या अपेक्षा त्याची मोठी प्रेरणा शक्ती असते. जेव्हां त्यांचा भंग होतो त्याचे दुःख त्याला अनावर होते. मी मूर्ख कारण मी अपेक्षा करत होतो कीं, दुर्योधन चांगला वागेल. माणसाच्या अपेक्षांना मर्यादा नसतात. त्या सतत वाढत असतात. त्यांना आवरता येत नाही. दुसरे काय असते त्याच्या एवढे मजबूत ते मला सांगा. भिष्म सांगतात, ह्यासंदर्भात मी तुला एक गोष्ट सांगतो, ती सुमित्र व वृषभांची आहे. फार प्राचीन काळी हैहया वंशाचा एक राजर्षी होऊन गेला. त्याचे नांव होते सुमित्र. एकदा तो शिकार करण्यासाठी निघाला होता. तो एका हरणा मागे लागला. त्याला एक बाण तो मारतो. परंतु, ते हरण फार शक्तीमान होते, ते तसेंच धावत जात होते व राजा त्याच्यामागे. ते हरण उतरणीची जागा उतरून सपाट प्रदेशांत आले. राजा एका हातात धनुष्य व दुसर्या हातात तलवार असा त्याच्या मागे धावत होता. तो एकटा त्या शिकारीमागे धावत होता कित्येक नद्या, झरे, तलाव तो ओलांडत जात होता. ते हरण कधी त्याला दिसत होते तर कधी दिसत नव्हते. तरी तो अंदाजाने त्याचा मागोवा घेत होता. त्या हरणाला राजाचे अनेक बाण लागलेले होते. अधून मधून त्यांच्यातील अंतर कमी होत होते तर कधी जास्त होत होते. पण त्यांचे धावणे तसेंच चालू होते. एका वनातून दुसर्या वनात ते जात होते. एका ठिकाणी ते दोघे पुरेसे जवळ होते तेव्हां राजा नेम धरून एक बाण त्याच्या वर्मी मारतो. नेमके त्याच वेळी तो विशाल आकाराचा हरण एकदम उडी मारून दूर निघून जातो जणूकाय तो राजाला पळवत होता. राजाचा बाण चुकतो. आता ते हरण एका मोठ्या दाट अरण्यात शिरते. राजा त्याचा पाठलाग सोडत नाही.

शांती पर्व भाग एकशे चोविसावा संपला.

# शांती पर्व
## भाग एकशे पंचविसावा

भिष्म सांगत असतात, राजा त्या अरण्यात एका सन्याशांच्या आश्रमाकडे येतो. तो खूप थकलेला होता. तेथे तो विश्रांतीसाठी थांबतो. त्याला आलेले पहातांच तेथे असलेले संन्याशी त्याचे स्वागत करतात. त्याच्या हातातील धनुष्य व तलवार पाहून ते समजतात कीं तो शिकार शोधत आहे. राजा ते स्वागत स्वीकारतो व त्यांना त्यांच्या तपस्येबाबत विचारणा करतो. त्यांच्या चौकशीला ते उत्तर देतात व विचारतात त्याच्या अशा अचानक येण्याचे कारण काय? ते त्याला विचारतात त्याचा वंश कोणता व तो कोणत्या राज्यातील आहे. त्याचे नांव ते विचारतात. त्याचे ठिकाण कोणते तेसुद्धा विचारतात. राजा त्यांच्या सगळ्या प्रश्नाची उत्तर देतो. तो सांगतो कीं, तो हैहया वंशाचा राजा आहे. त्याचे नांव सुमित्र आहे. ते मित्राचा पुत्र आहे. तो पुढे सांगतो कीं, एका हरणाच्या मागे धावत तो तेथे आला आहे परंतु, ते हरण मात्र कोठे तरी नाहीसे झाले आहे. त्याच्या बरोबर त्याचे मंत्री आणि घरची माणसं सुद्धा आहेत पण ते आता येथे नाहीत. आम्ही शिकार करण्यासाठी निघालो होतो. एका मोठ्या हरणाला त्यांने बाण मारला व त्यानंतर तो त्या हरणामागे धावत तेथवर आला आहे असे सगळे तो त्या ऋषींना सांगतो. फार थकलो आहे असे तो त्यांना सांगतो. तो त्याना सांगतो कीं त्याच्या हरणामागे धावण्यात त्याचे सगळे राजेशाहीपण पुरते संपले आहे. एवढे करून सुद्धा ते हरण हातचे गेले त्याचे त्याला दुःख होत आहे. माझ्या त्या हरणाबद्दलच्या सगळ्या अपेक्षा धुळीला मिळाल्या आहेत असे तो त्या संन्याशाना सांगतो. त्यापेक्षा तुम्ही वैराग्याच्या सागरात डुबत मोठे सुखी दिसता. पुढे तो विचारतो त्या बैराग्यांना, मला सांगा माणसाच्या अपेक्षा आणि आकाश ह्यात कोण जास्त विशाल आहे असे तुम्हाला वाटते? मला सांगा माणसाने आशा करणे कसे सोडावयाचे असते. जर तुमच्याकडे त्याचे उत्तर असेल तर मला सांगा. जर माझ्या प्रश्नामुळे तुम्हाला कांही त्रास होणार असेल तर उत्तर देण्याची आवश्यकता नाही. मी माझे कुतूहल म्हणून विचारत होतो. जर तुमच्या कडे उत्तर असेल तर द्या. शांती पर्व भाग एकशे पंचविसावा संपला.

# शांती पर्व
## भाग एकशे सव्विसावा

भिष्म सांगतात, त्यानंतर तेथे असलेले ऋषी वृषभ सांगतात, पूर्वी पवित्र तीर्थांचे पर्यटन करत करत मी एकदा नर व नारायणांच्या आश्रमाकडे गेलो होतो. तेथे बद्री नावांचे तीर्थक्षेत्र आहे. तेथेच आहे एक सरोवर ज्यातून गंगा वाहत असते. तेथे ऋषी अश्वशिरस वेदाचे पठण करत असतात. मी तेथे नर व नारायणांच्या आश्रमात गेलो. तेथे मी एक उंच बांदा असलेले एक ऋषी पाहिले. त्यांच्या अंगावर चिंध्या होत्या व ते फार कृश होते. ते माझ्याकडे येत होते. त्यांचे नांव होते तनू. ते साधारण माणसापेक्षा आठपट उंच होते. त्याच्या कृशपणाची मी कशाचीही तुलना करू शकणार नाही इतके ते कृश होते. त्यांच्या शरीराचे अवयव कमालीचे पातळ होते. त्यांचे डोके शरीराप्रमाणे होते. त्यात त्यांचे डोळे, कान, नाक त्या प्रमाणात होते. त्यांचा आवाज फार अशक्त वाटत होता. तशा रुपाला पाहून मी घाबरून गेलो. त्यांना मी उभे होऊन नमस्कार केला. मी माझी त्यांना ओळख करून दिली. ते ऐकल्यावर तो ब्राह्मण त्याला दिलेल्या आसनावर बसला. मी सुद्धा बसलो. त्यानंतर तो ऋषी तेथे असलेल्या इतर ऋषीं बरोबर पुण्यमार्गाबद्दल चर्चा करू लागला. त्या मध्ये पुण्य व हित ह्यांचा विचार होत होता. ते संभाषण होत असतांना त्या ठिकाणी राजा विरद्युम्नचे आप्त व मंत्री तेथे पोहोचतात. तो राजा त्या भागातील ख्यातनाम होता. त्याचा मुलगा भूरूद्युम्न हरवला असल्याचे समजते. त्याला आशा असते कीं, त्याचा मुलगा त्याला तेथे मिळेल. तो त्या आशेने तेथवर आला होता. तो राजा कांहीं दिवस त्या अरण्यात त्याच्या मुलाला शोधत फिरत होता. तो तेथे असलेल्या ऋषींना सांगतो कीं, त्याचा मुलगा फार हुशार आहे व त्याला शोधणे फार अवघड झाले आहे. राजा शोक करतो कीं, त्याचा तो एकुलता एक पुत्र होता. जरी तो सापडत नसला तरी माझी आशा आहे कीं, मला तो लवकरच सांपडेल. राजा बोलतो कीं, तो नाही मिळाला तर तो मरेन. ते बोल तो कृश ऋषी तनू ऐकतो व थोडा वेळ मान खाली घालून ध्यान करू लागतो. ते पाहून तो राजा जास्त खिन्न होतो. राजा त्या ऋषीला विचारतो मला सांगा तुम्हाला कांहीं दिसते आहे

कां? तो ऋषी गप्प होता परंतु, दुसरा ऋषी राजाला सांगतो कीं, तुमच्या मुलांनी तनूचा अपमान केला आहे. ते त्याने अजाणता केले होते. तनूने तुमच्या मुलाकडे सोन्याचा कलश आणि कांहीं औषधी मागितल्या होत्या. तुमचा मुलगा त्यांचे हसें उडवत गेला. राजा नामुष्कीने तनूच्या पायाशी बसतो. त्याची पुजा करतो. त्यानंतर इतर ऋषी तेथे गोळा होतात.

शांती पर्व भाग एकशे सव्विसावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे सत्ताविसावा

राजा बोलतो, मी राजा वीरद्युम्न आहे. मला ह्या प्रदेशात सगळे ओळखतात. माझा मुलगा भुरीद्युम्न हरवला आहे. त्याला शोधत मी येथवर आलो आहे. अहो ब्राह्मणानो, तो माझा एकुलता एक पुत्र आहे. ते निष्पाप आहे. तो खूप लहान आहे. तरी तो मला सांपडत नाही. त्याला शोधत मी सारखा ह्या वनात भटकत आहे. पुढे ऋषी वृषभ सांगत असतात, ते ऐकल्यावर तनू खाली मान घालून कसला तरी विचार करत आहेत असे वाटत होते. त्या ब्राह्मणांचा त्याआधी कोण्या राजाने फार सन्मान केला नव्हता. तो ब्राह्मण त्यासाठी मोठी तपस्या करत होता. त्याने ठरवले होते कीं, तो कोणाही राजाकडून कांहीं दान वगैरे स्वीकारणार नाही. त्यानंतर तो त्याच्याच मनाला सांगतो अपेक्षा माणसाला कशी नाचवत असते ते त्याने अनुभवले होते. तो स्वताच्या मनात ठरवतो कीं ह्यापुढे तो कसलीच अपेक्षा करणार नाही. त्याच वेळी तो राजा वीरद्युम्न बोलत असतो, तो विचारतो, "अपेक्षांच्या मर्यादा कशा असतात"?

ह्या जगात सर्वात अवघड काय आहे प्राप्त करण्यासाठी? मला सांगा अहो ब्राह्मण. आपण नैतिकतेच्या व हिताच्या सगळ्या गोष्टी चांगल्या जाणता. पुढे वृषभ सांगतात, तनू सगळ्या जुन्या गोष्टींची आठवण करत असतो. त्याचा राजाकडून झालेला उपमर्द आठवतो. त्यानंतर तो ब्राह्मण राजाला बोलतो, "अपेक्षा पेक्षा जास्त पातळ कांहींच नसते".

राजा बोलतो, "मला समजले आपल्याला काय बोलावयाचे आहे ते".

मला ते सुद्धा समजले कीं, अपेक्षा किती विविध रुप घेत असतात. त्यांची कशाशी हि तुलना करता येत नाही. मी समजतो कीं, हे श्रृतीत दिले आहे. आपण मोठे सूज्ञ अहात, तरी मला एक प्रश्न पडतो तो तुम्हाला विचारतो, "अहो ब्राह्मण आपल्या पेक्षा जास्त कृश काय असू शकेल"? तुम्हाला हरकत नसेल तर उत्तर द्या. ऋषी बोलतो, "त्याचे उत्तर मुष्किल आहे. कदाचित कांहीं नसेल. तरी सांगतो, जो राजा दिलेले शब्द पाळत नाही त्याचे आश्वासन माझ्या शरीरापेक्षा जास्त पातळ असू शकते".

खोट्यांच्या शब्दावर अवलंबून रहाणे, दुष्टाच्या कृपेची अपेक्षा करणे, आळशी माणसाकडून कामाची अपेक्षा करणे, अशा अपेक्षा माझ्या अंगापेक्षा कृश असतात. त्यांच्या भरवशावर फक्त मूर्ख असतात. एकुलत्या एका मुलाला शोधणार्याची अपेक्षा माझ्या शरीरापेक्षा कृश असेल. वयात आलेल्या कुमारीकेच्या मनातील आशा तशाच माझ्यापेक्षा कृश असतात. ते ऐकल्यावर शरमेने तो राजा व त्याचे कुटूंब त्याच्यापुढे साष्टांग नमस्कार घालतात.

राजा हात जोडून विनंती करतो कीं त्याला त्याचा मुलगा मिळेल असे करा. त्यानंतर तनू राजाचा मुलगा त्याच्या तपस्येच्या बळावर पुढे आणतो. त्यानंतर तो ऋषी राजाला चांगलीच समज देतो व त्यास चांगुलपणाचे व लीनतेचे महत्व समजावून देतो. त्या नंतर समजते कीं, तनू साक्षात चांगुलपणाची देवता होती. त्यानंतर तनू नजिकच्या अरण्यात निघून जातो.

वृषभ सागतात कीं, त्याना हे सगळे प्रत्यक्ष अनुभवले आहे. म्हणून कशाचीही आशा न ठेवणे हेंच योग्य असते.

भिष्म पुढे सांगतात, ते ऐकल्यावर राजा सुमित्र त्याच्या त्या हरणाबद्दलच्या अपेक्षा सोडून देतो व निवांत होतो. अरे पंडुपुत्रा, हे ऐकल्यावर तूसुद्धा फार मोठ्या अपेक्षा करण्याचे सोडून दे आणि निरपेक्षपणे तुझे काम करत रहा.

शांती पर्व भाग एकशे सत्ताविसावा संपला.

# शांती पर्व
## भाग एकशे अठ्ठाविसावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, अमृत प्याल्यानंतर जसे वाटते तसे वाटत आहे तुम्हाला ऐकतांना. स्वताचे ज्ञान झालेला जसे ध्यानात अखंड बसू शकतो तसा मी आपले निरुपण ऐकतांना कधीच कंटाळत नाही. मला पुन्हा नैतिकतेवर प्रवचन करा त्यातून माझी बुद्धी सुधारेल असे वाटते.

भिष्म सांगू लागतात, नैतिकते बद्दल मी तुला एक संवाद झाला होता तो सांगतो. तो ऋषी गौतम आणि यमामध्ये झाला होता. ऋषी गौतमांचे परिपत्र नांवाच्या डोंगरावर एक उपवन होते. त्या वनात ते साठ हजार वर्षे तप करत होते. एके दिवशी लोकपाल यम त्यांच्याकडे जातो. गौतमांना समजते कीं, त्यांच्याकडे यम आले आहेत. ते त्याला नमस्कार करतात व त्याची काय आज्ञा आहे म्हणून विचारतात. धर्म देव ते पाहून बोलतो, त्यांने गौतमासाठी काय करावे ते सांगावे.

गौतम बोलतात, "मला सांगा, मातापित्याचे ऋण फेडण्यासाठी माणसाने काय केले पाहिजे ते सांगा. मला सांगा, पूर्णानंद अवस्थेत कायम रहाण्यासाठी काय केले पाहिजे"?

यम बोलतो, शुद्ध आचार विचार ठेवून जो माता व पिता ह्यांची न थकता सेवा करतो आणि त्याशिवाय सगळ्यांच्या भल्याचे काम करतो तो त्यामुळे त्याच्या मातापित्याचे ऋण फेडत असतो. तसेंच परवडत असेल तर अश्वयज्ञ करावेत ब्राह्मणांच्या मदतीने म्हणजे तो पूर्णानंदाच्या अवस्थेत कायम जाईल.

शांती पर्व भाग एकशे अठ्ठाविसावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे एकोणतिसावा

युधिष्ठीर पुन्हा विचारतो, "मित्र नसलेल्या राजाने कोणते धोरण ठेवावे जेव्हां त्याच्या भोवती शत्रूंचा गराडा पडला आहे. त्याचा खजिना रिकामा झाला आहे आणि त्याचे सैन्य कमी आहे, त्याचे मंत्री लुच्चे आहेत, त्याच्या सल्लागारात मतभेद आहेत, त्याला नेमके काय करावयाचे ते समजत नाही.

तसेंच जेव्हां राजा दुसर्या राज्यावर चाल करतो, शत्रूच्या सैन्याचा संहार करत असतो, आणि जेव्हां तो कमजोर असूनही बलाढ्य शत्रूंशी लढत असतो, अशावेळी त्याची भूमिका कशी असावी ते सांगा.

तसेंच जेव्हां राजाच्या राज्याचा कारभार अव्यवस्थित आहे, ज्याला काळ, काम व वेगाचे गणित जमत नाही, ज्याला शांतता प्रस्थापित करता येत नाही. अशावेळी त्यांने पापमार्गाने धन जमवले तर चालते कां"?

भिष्म सांगतात, राजाच्या कामाबद्दल तू जाणत आहेस, तुझा प्रश्न, राजाच्या कारभारा बद्दलचे मोठे गुपित उघड करणारा आहे. राजाच्या कारभारातील नैतिकता लवचिक असते, संहितेत जे दिले आहे त्याचे विविध अर्थ त्यासाठी काढून त्या नैतिकतेचे समर्थन केले जात असते. एकादे कार्य चांगुलपणाचे असते तर तेंच दुसर्या परिस्थितीत वाईटपणा ठरू शकते. आपत्काळी राजाला हित पहावयाचे असते. त्यास आपद्धर्म असें म्हणतात. तो राजाच्या चतुराईचा भाग असतो. तो जर बुद्धीने काम करील तर तत्वतः तो ते कधीच करू शकणार नाही. परंतु, त्या वाईट काळात तो कदाचित बळजबरीने धन प्रजेकडून घेईल परंतु, जेव्हां राज्याची परिस्थिती सुधारते तेव्हां तो ते धन कर सवलतीच्या रुपाने त्या प्रजेला परत करणार असेल तर ते कृत्य पाप ठरणार नाही. अशावेळी राजा त्याच्या प्रजेला विश्वासात घेऊन तशी कारवाई करत असतो. तसे असेल तर ते पाप होत नाही. राजाचा खजिना खाली झाला त्याचे काय कारण ते त्याने प्रथम शोधून काढले पाहिजे. खजिना खाली म्हणजे राजा गरीब झाला असे होते. त्यावेळी तो वैश्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या कडून व श्रीमंत ब्राह्मणांकडून धन उधार

मागू शकतो. प्रसंगी शेजार राज्यात तो त्याचे शिलेदार लुटारूच्या रुपांत धाडून त्या राज्याला लुटू शकतो. *त्या आक्रमाणाला मराठी लोक सिमोल्लंघन असें म्हणतात. मराठा राजे प्राचीन काळापासून पावसाळ्यानंतर महाराष्ट्राबाहेर हिंदूस्थान भर लुटमार करत असतं त्यांच्या राजाचा खजिना भरण्यासाठी असे पुरावे इतिहासात आहेत.* ते पाप असले तरी त्याची भरपाई जर तो कोणत्याही प्रकारे करणार असेल तर ते पाप समजले जात नाही. कांहीं ऋषी त्या लुटीचे समर्थन करतात त्या कृत्याची तुलना स्वताच्या संरक्षणाशी करून. म्हणजे जसे स्वताचे संरक्षण करण्यासाठी दुसर्याला ठार मारले तरी ते पाप समजले जात नाही त्याच प्रमाणे स्वताच्या राज्याला वाचवण्यासाठी त्याने केलेली लुटमार क्षम्य असते. *मराठा शिलेदार संपूर्ण उत्तर हिंदूस्थान भर लूट करत होते त्यांच्या राजाचा खजिना भरण्यासाठी. ते क्षम्य समजले गेले होते ह्यांच तर्कानुसार.* प्रसंगी तो राजा त्याच्या शेजारच्या राजाला संरक्षण देण्याचे आश्वासन देऊन त्याच्या कडून खंडणी गोळा करून स्वताचा खजिना भरू शकतो ते पाप समजले जात नाही. ब्राह्मणसुद्धा आपत्काळी शुद्राच्या अथवा वेश्येच्या घरात पुजा करण्यास जाऊ शकतो, ते सर्वमान्य आहे. तसेंच हे असते. आपत्काळ त्याचे नियम वेगळे ठरवतो. परिस्थिती सुधारल्यावर मात्र राजा तसे वागणार नाही, ब्राह्मणसुद्धा शुद्राकडे पुजा करण्यास जाणार नाही. म्हणून श्रृती सांगते कीं, आपत्काळी आपद्धर्म आचरावा. ते क्षम्य समजले जाते. राजाप्रमाणे सर्वच लोकांना हा नियम लागू असतो. जगण्यासाठी अथवा जीवंत रहाण्यासाठी जे वेगळे नियम असतात ते कोठेही लिहीलेले नसतात. माणसांने स्वताच्या चतुराईने ते व्यवहारात आणावयाचे असतात. कारण जीवंत रहाणे अथवा दुसर्याला जगवणे हे एक मोठे पुण्यकर्म असते. त्यात चौर्यकर्म सुद्धा येते. जगण्यासाठी चोरी सुद्धा करण्याची मुभा शास्त्राने दिली आहे. सृष्टीच्या नियमानुसार, जीवो जीवस्य जीवनम्, हा सर्वमान्य नियम आहे. तुम्ही मांसाहार करा अथवा शाकाहार करा, जीवाची हत्त्या करावीच लागते. ते क्षम्य आहे. परंतु, त्या हत्त्येत हिंसा नसावी असें सांगितले आहे. म्हणजे जीवाला (प्राणी अथवा वनस्पती) दुःख न देता त्याला मारण्याची मुभा असते जर तो खाण्यासाठी मारला जात असेल तर. हा प्राचीन नियम आहे व तो नित्य आहे. हे सगळे नियम आपद्धर्मात येतात.

राजाचे सैन्य पुण्यकर्मासाठी असते असे संवर सांगतो. त्याला सांभाळण्यासाठी धन आवश्यक असते ते मिळवणे राजाचे कार्य असते व त्यात त्याला त्याच्या प्रजेचा आधार असावा लागतो. ज्या राज्यातील लोक धनासाठी परदेशाच जातात कारण ते राज्य धनहीन झाले आहे. त्या राज्याच्या राजाचा व त्या प्रजेचा संवराने धिक्कार केला आहे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, आपद्धर्माचे नियम एरव्हीच्या नियमांपेक्षा विपरित असतात. जो राजा ते समजून त्याचे कार्य करतो, तो सूज्ञ राजा म्हणून ओळखला जातो. असे सांगतात मोठे पाप टाळण्यासाठी छोटे पाप करण्याची मुभा असते. तो नियम आपद्धर्माला लागू होतो. सर्वनाश होण्यापेक्षा थोडे नुकसान झाले तर ते परवडते. पुण्य, हित आणि सुख ह्यातील पुण्य आत्म्याच्या उद्धारासाठी असते व हित आणि सुख शरीराच्या उद्धारासाठी असते. आपद्धर्मात फक्त शरीराचा विचार केला जातो म्हणून तो चतुराईचा भाग समजला जातो. जर शरीर शाबूत तर सगळे कांहीं, हे तत्त्व येथे असते. त्यात फक्त हित आणि सुखाचा विचार असतो. परिस्थिती सुधारली कीं, आत्म्याचासुद्धा विचार करण्याचे सुरू होते. असे व्यावहारिक धोरण संहितेने मान्य केले आहे. म्हणून त्या वाईट परिस्थितीत आत्म्याच्या अध्यात्मिक र्हासाचा विचार केला जात नाही. परंतु, परिस्थिती सुधारल्यावर मात्र आत्म्याच्या उद्धाराचा विचार प्रामुख्याने करण्याचे बंधन माणसावर असते. सामान्य परिस्थितीत आपद्धर्माप्रमाणे वागणे वर्ज्य असते. तसे केले तर तो राजा नरकात जातो. श्रीमंत असणे राजासाठी महत्वाचे असते. त्यासाठी त्याला प्रसंगी परदेशात जाऊन लुट करण्याची संहितेने परवानगी दिली आहे. त्याचप्रमाणे राज्यात संपत्ती निर्माण करणारे शेतकरी, व्यापारी, कसबी कारागिर अशांना राजा उत्तेजन देईल व राज्यावर आपद्धर्म पाळण्याची वेळच येणार नाही असे पाहिलं तर ते जास्त उचीत असेल. तशा मार्गाने धन मिळवणे पुण्यकर्म असते त्यामुळे पुण्य, हित आणि सुख असे सगळे साध्य राजा करू शकेल.

शांती पर्व भाग एकशे एकोणतिसावा संपला.

## - राजधर्मानुशासन पर्व संपले -

## –शांती पर्व भाग तीन संपला–

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७७ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईंदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळीराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.

esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद,